अहवाल क्रमांक :१३२

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदांच्या
सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन
अहवालातील परिच्छेदाबाबत

सातवा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २२ डिसेंबर, २०११ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०११

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदांच्या सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

सातवा अहवाल

(तीन)

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(दिनांक ४ मार्च, २०१०)

समिती प्रमुख

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(चार)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी,
श्री.पं.रु.पाटील, कक्ष अधिकारी,

(पाच)

पंचायती राज समिती
(२००८-२००९)
(दिनांक १४ ऑगस्ट २००८ पासून)

समिती प्रमुख

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य

*२. श्री.राजन पाटील, वि.स.स.

३. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

४ श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

५ श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

६ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**\७ रिक्त

८ श्री.पी.एन.पाटील, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.

११ श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.

१२ श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३ श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४ श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.

१५ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री.टी.पी..कांबळे, वि.स.स.

१९ श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

२० श्री.हेमंत पटले, वि.स.स.

(सहा)

२१ श्री.राजन तेली, वि.प.स.

२२ श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२३ श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

२४ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव,
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव,

---

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समोवश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्मानलीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

(सात)

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सातवा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००३-२००४ या वर्षाच्य लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २००८-२००९ साठी गठीत झालेल्या समितीने धुळे, लातूर व अमरावती या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने धुळे जिल्हा परिषदेस दिनांक १०, ११ व १२ फेब्रुवारी, २००९ रोजी भेट देऊन श्री.दिपेंद्र सिंह कुशावह, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.ह.ना.कोकणी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, धुळे जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने लातूर जिल्हा परिषदेस दिनांक १, २ व ३ जुलै, २००९ रोजी भेट देऊन डॉ.प्रविण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.बिभिषण तांबडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लातूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने अमरावती जिल्हा परिषदेस दिनांक ४, ५, ६ व ७ ऑगस्ट, २००९ रोजी भेट देऊन श्री.ओमप्रकाश बकोरीया, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एम.एच.हुसैन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अमरावती जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुक्रमे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० रोजी जिल्हा परिषद, धुळे, दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ व १ मार्च, २०११ रोजी जिल्हा परिषद, लातूर व दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजी जिल्हा परिषद, अमरावती संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

(आठ)

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.यु.के.खोब्रागडे, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, श्री.जे.के.बाँठिया, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग, श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्री.गिरीराज प्रधान सचिव, जलसंधारण विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या धुळे, लातूर व अमरावती

जिल्हा परिषदांच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत..

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजी च्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक : २० डिसेंबर, २०११.

बबनराव शिंदे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

(नऊ)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	परिच्छेद क्रमांक	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)		(४)
		प्रकरण एक		
		धुळे जिल्हा परिषद		
१	१.१	सन २००३-२००४ या वर्षात जिल्हा परिषदांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी.	३.५६८	
२	२.१	**प्रकरण दोन**		
		लातूर जिल्हा परिषद		
		कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजना दिघोळ देशमुख कामातील गंभीर अनियमिततेबाबत.	३.३०८	
	२.२	अपूर्ण कामाबाबत	३.५६३	
		प्रकरण तीन		
		अमरावती जिल्हा परिषद	३.१८	
३	३.१	यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत काँक्रीट रस्ता व नाली बांधकामतील अनियमितता.		
४		**परिशिष्ट**		
		समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त		

प्रकरण एक

जिल्हा परिषद, धुळे (लेखा)

सन २००२-२००३ या वर्षात जिल्हा परिषदांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

(परिच्छेद क्र. ३.५६८)

सन २००३-२००४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.४) जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत झालेल्या नियमबाह्य बाबी संदर्भात लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

अ.क्र.	नियबाह्य बाबींचे स्वरुप	जिल्हा परिषद विभाग	परिच्छेद क्रमांक	रक्कम रुपये
१.	अफरातफर प्रकरणांबाबत	सामान्य प्रशासन विभाग	२४	२,६७,९९,६३१
२.	जिल्हा परिषद रोखवही व बँक पासबुक यांच्या शिल्लकेतील तफावत	वित्त विभाग	३०	१,७९,४५,४९४
३.	सिमेंट, स्टील व डांबर वसुली न केल्याबाबत	बांधकाम विभाग	०६	१२,८३,५१६

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

सामान्य प्रशासन विभाग :

१. ग्रामपंचायत विभागाने खास लेखा प्रतिवृत्त अहवालाचे ग्रामनिधी व जरोयो चे पंचायत समिती निहाय नोंदवही ठेवण्यात आली आहे व अद्यावत करण्यात आली आहे.

२. स्थानिक निधी लेखा धुळे कार्यालयाने विशेष लेखापरिक्षण अहवाल पाठविलेले असून सन २००३-०४ अखेर प्रकरणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

तपशिल	प्रकरण संख्या	गुंतलेली रक्कम
ग्रामनिधी	२२६	४३,७९,५७६.७३
जरोयो	१८२	२,२४,२०,०५४.७७
एकूण	४०९	२,६७,९९,६३१.५०

त्यापैकी ग्रामनिधीच्या अपहारित रकपैकी रु. १०,९०,२५५.३३ मात्र वसुली झाली आहे. उर्वरित रक्कम रु. ३२,८९,३२१.४० मात्र वसूल होणे बाकी आहे. ती रक्कम वसुली करणेबाबत पंचायती समिती स्थरावर कारवाई सुरु आहे व जवाहर रोजगार योजनेची अपहारित रकमेपैकी रु. ६७,४०,४७९.२३ मात्र वसुल झाली असुन उर्वरित रक्कम रु. १,५६,७९,५७५.५४ वसुल होणे बाकी आहे. ती वसुली होणेबाबत पंचायती समिती स्थरावर कारवाई सुरु आहे.

३. ग्रामनिधीच्या २२६ प्रकरणापैकी ६० प्रकरणे निकाली काढणेसाठी प्रकरण निहाय अहवाल सादर केले आहेत व जरोयोच्या १८३६ प्रकरणांपैकी २३ प्रकरणे निकाली काढणेसाठी प्रकरण निहाय अहवाल उपमुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी लेखा धुळे यांना अहवाल पाठविले आहे. त्यात एकूण रक्कम रु. १२,३८,१३८.२६ मात्र वसुल झाली व काही प्रकरणी रक्कम समयोजित झाली आहे.

४. उर्वरित प्रकरणांपैकी ग्रामनिधीच्या ४ प्रकरणी व जरोयोच्या ९ प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल केलेला असून सदर १३ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. त्यात एकूण रक्कम रु. ७,१६,८७०.७७ मात्र गुंतलेली आहे.

५. तसेच इतर प्रकरणात वसुलपात्र रक्कम वसुलीबाबत पत्र दि.८/७/२००५ व १/१०/२००५ व १७/५/२००६ दि.१९/६/२००६ अन्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांना पत्र पाठवून शिस्तभंग विषयक कार्यवाही करणेबाबत, खाते चौकशी सुरु करणेबाबत व दोषी व्यक्ती विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करणेबाबत, प्रकरण निहाय कळविणेत आलेले आहे. त्यानुसार कारवाई प्रगतीत आहे.

६. अपहार प्रकरणातील वसुलपात्र रक्कम वसुली बाबत कार्यवाही पंचायती समिती स्थरावर सुरु आहे. तसेच सदरच्या खास प्रतिवृत्तात मोठ्या प्रमाणात प्रमाणके नाहीत. त्या प्रकरणी पंचायत समिती स्थरावर समायोजनाचे व वसुलीचे काम सुरु आहे.

वित्त विभाग :

जिल्हा परिषद, धुळे येथील वित्त विभागात ठेवण्यात आलेल्या अभिकरण योजना व हस्तांतरित योजनेच्या रोखवहीतील शिल्लक व बँकेतील शिल्लक यात ताळमेळ घेण्याचे काम सुरु असून माहे ऑक्टोबर, २००३ पर्यंत ताळमेळाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. हस्तांतर योजनेच्या रोखवहीतील व बँकेतील शिल्लकेतील तफावत रु. २,००,२१,५७५.११ तसेच अभिकरण योजनेच्या रोखवहीत व बँकेतील शिल्लकेतील तफावत रु. १,७९,४५,४९३.९७ ही न वटलेल्या धानादेशाची रक्कम आहे. सदर न वटलेल्या धनादेशाची यादी नोंदवहीत नमुद करण्यात आलेली आहे. उपरोक्त धनादेश वटल्यानंतर सदरची तफावत कमी झाली आहे.

बांधकाम विभाग :

बांधकाम विभाग धुळे जिल्हा परिषद येथील सिमेंट सस्पेंस नोंदवही नु ासर माहे नोव्हेंबर ९७ अखेर शिल्लक रु. १२,८३,५१६/- इतकी आहे. माहे मार्च १९९६ पासून सिमेंट खरेदी बंद असून पूर्वीचे वाटप केलेले सिमेंट नंदूरबारसह १० तालुक्यांना वाटप झाले असून बांधकाम विभाग जिल्हा परिषद, नंदूरबार कडील तालुक्यांकडून सिमेंट वसुली बाबत माहिती प्राप्त करुन त्यांच्या नोंदी अर्थ विभाग जिल्हा परिषद, धुळे येथील नोंदवहीशी ताळमेळ घेण्याचे काम सुरु असून सदर नोंदवही अद्यायावत करुन पुढील लेखापरिक्षणाच्या वेळी सादर करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

धुळे जिल्हा परिषदे कडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने जिल्हा परिषद, धुळेला भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि. १० फेब्रुवारी, २००९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सदर प्रकरणाची वस्तुस्थिती विचारली असता असे सांगण्यात आले की, ग्रामनिधी आणि जवाहर रोजगार योजनेमध्ये अफरातफर झालेली आहे. ग्रामनिधीचे सर्वात जुने प्रकरण १९६३ सालातील व जवाहर रोजगार योजनेतील सर्वात जुने प्रकरण १९८९ सालातील आहे. ग्रामनिधीच्या २२६ प्रकरणांपैकी ७७ प्रकरणे निकाली काढण्यासाठी अहवाल सादर केले आहेत. तसेच जवाहर रोजगार योजनेच्या १८३ प्रकरणांपैकी २३ प्रकरणे निकाल

काढण्यासाठी उपमुख्य लेखापरिक्षक (स्थानिक निधी) (लेखा), धुळे यांच्याकडे अहवाल पाठविले आहेत. ग्रामनिधीत झालेल्या अफरातफरीत गुतलेली रक्कम रु.४३,७९,५७६/- असुन रु.१०,९०,२५५/- वसुल करण्यात आले आहेत व आता रु.३२,८९,३२१/- वसुली होणे बाकी आहे. जवाहर रोजगार योजनेच्या अफरातफरीमध्ये रु.२,२४,२०,०५४/- गुंतले असून त्यापैकी रु.६७,४०,४७९/- वसुली झाली आहे व आज रोजी रु.१,५६,७९,५७५/- वसुली होणे बाकी आहे. त्यावर समितीने ज्या रक्कमेची वसूली होणे बाकी आहे ती केव्हा वसूल करण्यात येईल तसेच २७९ प्रकरणातील किती व्यक्ती जिल्हा परिषेदच्या सेवेत आहेत व त्या कर्मचाऱ्यांकडून किती वसुली करावयाची आहे. याबाबत विचारणा केली असता असा खुलासा करण्यात आला की, अफरातफरीच्या प्रकरणात सरपंच आणि ग्रामसेवक गुंतलेले होते. सरपंचांवर कलम ३१ (१) अंतर्गत कारवाई करुन, त्यांना अपात्र ठरविले आहे. तसेच सदर प्रकरणात एकूण २७९ कर्मचारी गुंतलेले आहेत. त्यापैकी १३ कर्मचारी निवृत्त झाले असून, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले असून त्यांना निवृत्ती वेतन सुद्धा दिलेले नाही. उर्वरित कर्मचारी जिल्हा परिषदेच्या सेवेत सध्या कार्यरत आहेत. त्यांच्याकडून वसुली करावयाची आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, अपहारित रक्कम वसुल करण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांना कळविल्याचे सांगितले आहे. गटविकास अधिकाऱ्यांनी ही रक्कम वसुल करण्यासाठी काय प्रयत्न केले. त्यावर असे सांगण्यात आले की, पंचायत समिती, धुळे येथे २००४-०५ पूर्वी अफरातफरची ७९ प्रकरणे उघडकीस आली होती. त्यामध्ये १६,८७,०००/- रु गुंतलेले आहेत. जी रक्कम गुंतलेली आहे ती वसुल करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. समितीने पुढे अशीही विचारणा केली की, शासनाच्या दि. २८ सप्टेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार वसुलीची जबाबदारी मुख्य कार्यकरी अधिकारी यांची आहे. त्यानुसार वसुलीसाठी किंवा कारवाईसाठी काय प्रयत्न केले. त्यावर असे सांगण्यात आले की, याबाबत ड्राईव्ह घेतलेला आहे. ज्या ज्या वेळी पंचायत समित्यांमध्ये बैठका घेतो, त्या त्या वेळी ग्रामसेवकांच्या बैठकीत अजेंड्यावर हा पहिल्याच क्रमांकाचा विषय असतो. ग्रामनिधीच्या १४ प्रकरणातील दोषी व्यक्ती मयत झाल्या आहेत. ६० प्रकरणांमध्ये वसुलीची रक्कम वसुल केली आहे. ४७ प्रकरणांमध्ये नोटीसा इश्यू केल्या असून ६० प्रकरणांमध्ये खातेनिहाय चौकशी सुरु केली आहे. ५ प्रकरणांमध्ये खातेनिहाय चौकशी प्रस्तावित केली आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, आढावा घेतल्यानंतर ॲक्शन काय घेतली हे महत्वाचे आहे. रु. २,६७,९९,६३१ पैकी फक्त ६७ लाख रुपये वसुल झाले. रु. १.५६ कोटी अद्यापही थकित आहे. ही रक्कम किती

दिवसात वसुल होणार आहे. आढावा घेत असताना ही रक्कम वसुल करण्याबाबत काय कारवाई केली. किती ग्रामसेवकांवर कारवाई केली, त्यावर असे सांगण्यात आले की, प्रत्येक प्रकरणात सीईओ म्हणून कारवाई केलेली नाही. आढावा बैठक घेऊन त्यांना सूचना देण्यात आल्या व त्यानुसार संबंधित उपमुख्य कार्यकरी अधिकारी यांनी कारवाई सुरु केली आहे.

त्यावर समितीने असे निदेश दिले की, एका महिन्याच्या आत सर्व संबंधितांवर कारवाई करावी अणि या संदर्भातील वसुलीसहित माहिती असलेला अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

समितीने उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.

१. ग्रामविकास निधी आणि जवाहर रोजगार योजनेमध्ये आतापर्यंत किती अपहारीत रक्कम वसुल करण्यात आली. उर्वरित रक्कम वसुलीची सद्यस्थिती काय आहे ?

२. अपहारात दोषी आढळणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली ? नसल्यास त्याची कारणे काय ?

३. या प्रकरणी किती जणांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु आहे ? या प्रकणांची सद्यस्थिती काय आहे, तसेच किती प्रकरणांत फौजदारी स्वरुपाची कार्यवाही केली आहे ? नसल्यास त्याची कारणे काय ?

४. सदर प्रकरणी जबाबदार असणारे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या काय , असल्यास केव्हा ?

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. सदर लेखापरिक्षणात ग्रामनिधी व जरोयोची एकूण ४०९ प्रकरणे आहेत त्यात गुंतलेली रक्कम रु. २,६७,९९,६३१/- मात्र आहे. खालीलप्रमाणे वसुली करण्यात आलेली आहे.

वर्ष	योजना	एकूण प्रकरणे	गुंतलेली रक्कम	निकाली प्रकरणे	वसुल रक्कम	शिल्लक प्रकरणे	वसुल करावयाची रक्कम
२००३-०४	ग्रामनिधी	२२६	४३,७९,५७६	६०	१०,९०,२५५	१६६	३२,८९,३२१
	जरोयो	१८३	२,२४,२०,०५४	२३	६७,४०,४७९	१६०	१,५६,७९,५७५
	एकूण	**४०९**	**२,६७,९९,६३०**	**८३**	**७८,३०,७३४**	**३२६**	**१,८९,६८,८९६**
२००४-०५	ग्रामनिधी	१६६	३२,८९,३२१	४	६३,०९१	१६४	३२,२६,२३०

	जरोयो	१६०	१,५६,७९,५७५	४	३,७०,४२६	१५६	१,५३,०९,१४९
	एकूण	**३२६**	**१,८९,६८,८९६**	**८**	**४,३३,५१७**	**३२०**	**१,८५३५,३७९**
२००५-०६	ग्रामनिधी	१६४	३२,२६,२३०	२४	१,६४,३०२	१४०	३०,६१,९२८
	जरोयो	१५६	१,५३,०९,१४९	१४	३,००,५९९	१४२	१,५०,०८,५५०
	एकूण	**३२०**	**१,८५,३५,३७९**	**३८**	**४,६४,९०१**	**२८२**	**१,८०,७०,४७८**
२००६-०७	ग्रामनिधी	१४०	३०,६१,९२८	१७	९२,७६५	१२३	२९,६९,१६३
	जरोयो	१४२	१,५०,०८,५५०	८	३,०३,२३३	१३४	१,४७,०५,३१७
	एकूण	**२८२**	**१,८०,७०,४७८**	**२५**	**३,९५,९९८**	**२५७**	**१,७६,७४,४८०**
२००९-१०	ग्रामनिधी	१२३	२९,६९,१६३	५६	५,४०,८८९	६७	२४,२८,२७४
	जरोयो	१३४	१,४७,०५,३१७	२२	१४,७७,७८६	११२	१,३२,२७,५३१
	एकूण	**२५७**	**१,७६,७४,४८०**	**७८**	**२०,१८,६७५**	**१७९**	**१,५६,५५,८०५**

वरीलप्रमाणे ग्रामनिधी व जरोयो वसुली करण्यात आलेली आहे. उर्वरित प्रकरणात दि.३१/७/२००९ रोजी पंचायती राज समितीसमोर साक्षी दरम्यान मा. समिती प्रमुख यांनी सदर अफरातफर प्रकरणी संबंधित कालबद्ध कार्यक्रमांचे नियोजन करुन कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याप्रमाणे सदर प्रकरणांत गुंतलेल्या रक्कमेचा निपटारा करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद पातळीवर तालुका निहाय कालबद्ध नियोजन कार्यक्रम तयार करुन ७८ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून रु. २०,१८,६७५ वसुल व समायोजना करण्यात आलेले आहे. सन २००३-०४ ते २००९-१० अखेर २३२ प्रकरणे निकाली कढून त्यात गुंतलेली रक्कम रु. १,११,४३,८५२/- मात्र वसुल व समायोजित करण्यात आलेली आहे.

२. १४ प्रकरणांत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १/९/२००९ पासून नियोजनाप्रमाणे अफरातफर प्रकरणांत सर्व दोषी सरपंच व ग्रामसेवक यांचेविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यासंबंधी दि. १८/०२/२००९, ३०/०३/२००९, २७/०८/२००९ अन्वये सर्व गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पं) यांना आदेशीत करण्यात आलेले आहे.

३. ग्रामनिधी व जरोयोच्या १४ प्रकरणांत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आसून त्यात रु. ३३,५६,०९९ मात्र रक्कम गुंतलेली असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर

पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, तसेच दोन प्रकरणांत संबंधित कर्मचाऱ्यांवर शास्ती विषयक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

४. ग्रामनिधी / जरोयो अपहार प्रकरणा संबंधित सर्व गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पं) यांना कारणे दाखवा नोटीसा दि.२७/८/०९, १४/१२/०९ व दि.१८/१२/०९ अन्वये बजाविण्यात आलेल्या आहेत.

सचिवांची साक्ष :

समितीने उपरोक्त माहितीच्या आधारे दि. १५ नोव्हेंबर, २०१० रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली, साक्षीच्या वेळी समितीने लेखापरिक्षणामध्ये ग्रामविकास निधी व जवाहर योजनेची एकूण ४०९ प्रकरणे आहेत त्यात गुंतलेली रक्कम रु.१,६७,९९,६३१ आहे. नियमबाह्य प्रकरणात गुंतलेली रक्कम आणि सन २००३-०४ ते सन २००९-१० पर्यंत वसुल केलेली रक्कम यात बरीच तफावत आहे. त्याचबरोबर एकूण प्रकरणांची संख्या आणि निकाली निघालेल्या प्रकरणांची संख्या यामध्ये तफावत असून अजूनही बरीच रक्कम वसुल व्हावयाची आहे. तसेच, अनेक प्रकरणे निकाली काढावयाची आहेत या संबंधीची सद्यस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केली की, सन २००३-०४ साली एकूण ४०९ प्रकरणे होती आणि त्यामध्ये २ कोटी ६७ लाख ९९ हजार ६३१ रुपये गुंतले होते ही रक्कम वसुल करण्याच्या बाबतीत मोहिम राबविण्यात यावी असे सांगितले गेले. त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ही रक्कम वसुल करण्याची मोहिम राबविली होती. सन २००९-१० मध्ये २५७ प्रकरणे शिल्लक राहिली आहेत आणि त्यामध्ये १ कोटी ७६ लाख ७४ हजार ४८० रुपये गुंतले आहेत. त्यातील ७८ प्रकरणे त्या वर्षात निकाली काढली असून जवळजवळ २० लाख १८ हजार ६७५ रुपये वसुल करण्यात आले आहेत. अजून १७९ प्रकरणे शिल्लक आहेत आणि त्यामध्ये १ कोटी ५६ लाख ५५ हजार ८०५ रुपये वसुल व्हावयाचे आहेत. ती रक्कम वसुल करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणातील सगळी ६ प्रकरणे अफरातफरीची नाहीत. काही प्रकरणामध्ये मुल्यमापन झालेले नव्हते त्यामुळे नंतर मूल्यमापन करुन घेण्यात आले आहे. मात्र ज्या प्रकरणत अफरातफर झालेले आहे त्या प्रकरणात संबंधितांविरुद्ध कारवाई केलेली आहे. १४ प्रकरणामध्ये पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात

आले आहेत. अफरातफरीच्या ज्या प्रकरणात सरपंच आणि ग्रामसेवक गुंतलेले आहेत त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याबाबत सांगण्यात आलेले आहे. दोन ग्रामसेवकांना सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे आणि एकाला बडतर्फ करण्यात आले आहे. जे सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांच्या सेवा निवृत्ती नंतर मिळणाऱ्या रकमेतून ही वसुल करण्यात आली आहे. ५८ ग्रामसेवकांच्या वेतनवाढ बंद करण्यात आल्या आहेत. २० सरपंच आणि २९ ग्रामसेवकाविरुद्ध कारवाई सुरु केलेली आहे. या अपहाराच्या प्रकरणात जी रक्कम गुंतलेली आहे ती वसूल करण्याच्या दृष्टीने मोहीम सुरु करण्यात आली असून काही जण पैसे भरत नव्हते परंतु पोलीस केस दाखल केल्यानंतर ते सुद्धा पैसे भरतील.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अजून बरेच पैसे वसुल व्हावयाचे आहेत. ते पैसे केव्हा वसुल करण्यात येणार आहेत त्यावर असे सांगण्यात आले की, सरपंचाकडून रक्कम वसुल करावयाची आहे. परंतु, सगळ्याच ठिकाणी ही रक्कम वसुल करावयाची आहे असे नाही काही ठिकाणी समायोजन करावयाचे आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००३-०४ सालातील ही प्रकरणे असून आता २०१० साल सुरु आहे अजूनही बरीच प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याकरता काही तरी मुदत घातली पाहीजे त्यावर असा खुलासा करण्यात आली की, प्रकरण बंद केले काही प्रकरणामध्ये पोलीस चौकशी सुरु आहे तर काही प्रकरणामध्ये पगारातून वसूल करण्यात येत आहे. ज्या व्यक्ती नोकरीत कार्यरत आहेत त्यांची चौकशी करण्यात येत आहे त्यांच्याकडे जी रक्कम गुंतलेली आहे ती वसुल करण्यात येईल. एका वर्षात आम्ही ७८ प्रकरणे निकाली काढली आणि पैसे वसुल केले आहेत बाकीच्या प्रकरणातही पोलीस चौकशी आणि विभागीय चौकशी सुरु आहे. सरपंचाविरुद्ध कारवाई केली जात आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या व्यवहारामध्ये जी रक्कम गुतलेली आहे त्या प्रमाणात वसुल केलेली रक्कम फारच कमी आहे. त्यावर सचिवांनी असे सांगितले की, एका वर्षात ७८ प्रकरणे निकाली काढली असून जवळजवळ २० लाख १८ हजार ६७५ रुपये वसुल करण्यात आले आहेत. काही प्रकरणामध्ये पोलीसांत गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यात ३३ लाख रुपये गुंतले आहेत. बाकीच्या प्रकरणात चौकशी सुरु आहे. यातील सगळीच प्रकरणे अफरातफरीची नाहीत. काही प्रकरणामध्ये समायोजन झालेले नाही.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, इतका वेळ लागता कामा नये दोन महिन्यात हे काम होवू शकते. त्यावर सचिवांनी असा खुलासा केला की, काही प्रकरणात विभागीय चौकशी सुरु आहे. त्यामध्ये जबाबदारी निश्चित करावी लागेल. काही प्रकरणात पोलिसांमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला

आहे. वेगवेळ्या प्रकरच्या केसेस आहेत त्या निकाली काढण्यासाठी मोहिम सुरु करण्यात आली असून या वर्षी ७८ केसेस निकाली काढल्या आहेत बाकीची प्रकरणे लवकर निकाली काढण्यासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत असलेल्या सामान्य प्रशासन विभाग, वित्त व बांधकाम विभागात अनुक्रमे अफरातफर, जिल्हा परिषद रोखवही व बँक पासबुक यांच्या शिल्लकेतील तफावत व सिमेंट, स्टील व डांबर इत्यादी संदर्भात लेखापरिक्षणात आक्षेप घेण्यात आला असून त्यात विभागनिहाय अनुक्रमे २,६७,९९,६३१/- १,७९,४५,४९४/- व १२,८३,५१६/- एवढी रक्कम गुंतलेली आहे. सदर प्रकरणापैकी वित्त व बांधकाम विभागातील अफरातफरीच्या प्रकरणा संदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेला लेखी खुलासा समाधानकारक आहे. परंतु, सामान्य प्रशासन विभागातंर्गत असलेल्या अफरातफरीच्या प्रकरणे ही प्रामुख्याने ग्रामनिधी व जरोयो संदर्भातील असून त्याबाबत विशेष लेखापरिक्षण करुन घेण्यात आले होते व त्यानुसार ग्रामनिधीची एकूण २२६ प्रकरणे असून त्यात रु. ४३,७९,५७६.७३ व जरोयोची एकूण १८२ प्रकरणे असून त्यात रु. २,२४,२०,०५४.७७ एवढी रककम गुंतलेली आहे. ग्रामनिधी व जरोयोत गुंतलेली एकूण रककमेपैकी अनुक्रमे रु. १०,९०,२४४.३३ व ६७,४०,४७९.२३ वसुल करण्यात आली असून उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही पंचायत स्तरावर सुरु आहे.

ग्रामनिधी व जरोयाची सन २००३-०४ पर्यंत एकूण ४०९ प्रकरणे आहेत व त्यात एकूण रक्कम रु. २,६७,९९,६३१/- गुंतलेली आहे. समितीने भेट दिल्यानंतर जिल्हा परिषदेमार्फत साक्षीच्या वेळी सादर करण्यात आलेल्या माहितीवरुन सदर योजनेत सन २००३-०४ ते २००९-१० या कालावधीतील एकूण प्रकरणे व त्यात गुंतलेली रक्कम निकाली काढण्यात आलेली प्रकरणे व वसुल करण्यात आलेली रक्कम याबाबतची माहिती देण्यात आलेली आहे. परंतु, २००३-०४ मधील एकूण ४०९ प्रकरणांपैकी फक्त ८३ प्रकरणे निकाली काढण्यात येवून त्यातून रक्कम रु. ७८,३०,७३४ वसुल करण्यात आलेले आहेत. तसेच सन २००३-०४ ते सन २००९-१० पर्यंत झालेली अफरातफरीची प्रकरणे, त्यात गुंतलेली व वसुल करण्यात आलेली रक्कम लक्षात घेता फार मोठी तफावत दिसून येते तसेच सदर अपहाराच्या प्रकरणाचे प्रमाण कमी कमी होणे अपेक्षित असताना तसे झाल्याचे दिसून येत नाही.

सन २००९-१० मधील २५७ प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये १ कोटी ७६ लाख ७४ हजार ४८० रुपये गुंतलेले आहेत त्यापैकी फक्त ७८ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून १७९ प्रकरणे अद्यापर्यंत प्रलंबित असल्याची माहिती समितीपुढे आली समितीला साक्षीच्या दरम्यान अफरातफरीच्या प्रकरणासंदर्भात विशेष मोहिम राबविण्यात येत आहे व प्रत्येक पंचायत समितीच्या भेटी व बैठकीच्या वेळी यासंदर्भात पाठपुरावा करण्यात येत आहे असे सांगण्यात आले **परंतु प्रकरणाचा निपटारा ज्या संथगतीने होत आहे त्याबद्दल आश्चर्य वाटत आहे. अफरातफरीच्या प्रकरणाबाबतची कार्यवाही ज्या संथगतीने सुरु आहे त्याचा परिणाम म्हणून अशा प्रकरणांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे.**

अफरातफरीच्या प्रकरणात गुंतलेली रक्कम व वसुल करण्यात आलेली रक्कम यात फारच तफावत दिसून आली याबाबत खुलासा करताना ग्रामविकास विभागमार्फत असे सांगण्यात आले की, यातील सगळीच प्रकरणे अफरातफरीची नसून त्यामध्ये मुल्यांकनाच्या अभावामुळे तफावत दिसून येत आहे. मुल्यांकन करुन घेण्यात आल्यावर सदर रक्कमांचे समायोजन करणे शक्य होणार आहे. **परंतु, समितीला प्राप्त झालेल्या तोंडी व लेखी माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जिल्हा परिषदेमार्फत सदर प्रकरणी कारवाई करण्यास विलंब झाल्याने अशा प्रकरणात वाढ झालेली दिसून येते. अफरातफरीच्या प्रकरणांची तात्काळ चौकशी तसेच मूल्यमापन करण्यात आले असेत तर अशा प्रवृत्तीस आळा बसला असता व त्याच्या प्रमाणात देखली घट झाली असती परंतु जिल्हा परिषद, धुळेमार्फत अफरातफरीच्या प्रकरणाचा निपटारा करण्यात विलंब लागल्याने सदर प्रकरणात दोषी असलेल्या संबंधितावर कारवाई करण्यास विलंब झालेला आहे. तसेच, अशा प्रकारच्या विलंबामंळे संबंधित दोषी व्यक्तींविरुद्ध कारवाई करणे देखील कठीण होत असल्याचे समितीला प्राप्त झालेल्या माहिती वरुन दिसून येत आहे. सबब, समिती अशी शिफारस करीत आहे की, अफरातफरीच्या प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा आढावा घेवून एक कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात यावा व संबंधितांवर तात्काळ योग्य ती कारवाई प्रस्तावित करण्यात यावी व करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला देण्यात यावी. तसेच, अशा प्रकरणाच्या अनुषंगाने समिती शासनाच्या निदर्शनास असे देखील आणु इच्छिते की, राज्यातील सर्व जिल्हापरिषदातंर्गत अफरातफरीच्या प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे व त्यामागची कारणे देखील जवळजवळ एकसारखीच आहेत. त्यामुळे शासनस्तरावर प्रकरणे प्रलंबित राहण्याचा आढावा घेवून ती निकालात काढण्यासाठी ठोस व कालबद्ध उपाययोजना करावी. त्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेकडून अफरातफरीच्या**

प्रकरणाबाबतचा दर तिमाही अहवाल मागविण्याची कार्यपद्धती शासनाने यापुढे सुरु करावी, अशी ही शिफारस समिती करीत आहे.

प्रकरण दोन

जिल्हा परिषद, लातूर (लेखा)

कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना:- डिघोळ देशमुख कामातील गंभीर अनियमितते बाबत.(परिच्छेद क्रमांक ३.३०८)

सन २००३-२००४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्र.३.३०८ जिल्हा परिषद, लातूरने कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना, डिघोळ देशमुख कामाकरिता रक्कम रु.२१,९३,५४० इतका खर्च केलेला आहे.

यावर लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत :-

१) सदरील कामाची निविदा प्रसिध्दी दै.सामना व दै.नवाकाळमध्ये केल्याचे नमुद केले आहे. परंतु जाहिरात प्रसिध्दीचे पेपरचे कात्रण संचिकेत नाही. शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, झेडपीए-१०८३/प्र.क्र.१०१४/८०,दि.२८ फेब्रुवारी, १९९० प्रमाणे निविदा कालावधी किमान ३० दिवस असताना केवळ १३ दिवसाचाच कालावधी दिला गेला आहे. निविदा प्रसिध्दीचा किमान कालावधी पाळला गेला नसल्याने स्पर्धेचा फायदा जिल्हा परिषदेला झाला नाही.

२) अंदाजपत्रकामध्ये विहीर खोदकाम ६ मीटर व्यासाचे प्रस्तावित असताना प्रत्यक्ष खोदकाम हे ० ते ९ मीटर मध्ये १२ ते ३० मीटर व्यासाचे केलेले आहे. सदर जादा खोदकामास कार्यकारी अभियंता यांची पूर्वपरवानगी घेतलेली नाही. तसेच ९ मीटर नंतर विहीर खोदकामाचा व्यास ६ मीटर घेऊनच खोदकाम केलेल आहे. त्यामुळे ० ते ९ मीटरचे खोदकाम अनावश्यकरित्या जादा केलेले आहे. अंदाजपत्रकात विहीर खोदकामासाठी १ ते १५ मीटरसाठी रक्कम रु.८९,३०४ इतका खर्च प्रस्तावित होता. परंतु प्रत्यक्ष खोदकामासाठी १ ते ११.५० मीटरसाठी रक्कम रु.२,२२,००९ एवढा खर्च केलेला आहे. विहीरीचे खोदकाम निष्कारण जादा व्यासाचे केले असल्यामुळे प्रस्तावित खर्च रु.८९,३०४ अधिक १० टक्के वाढीव रक्कम रु.८,९३० नुसार रक्कम रु. ९८,२३४ इतका असताना रक्कम रु. १,२३,७७५ इतका जादा झालेला खर्च संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन वसुल करणे आवश्यक आहे.

३) कार्यकारी अभियंता (ल.पा.)यांचे पत्र क्रमांक ७९१ दि.१५ मे १९९९ ने गुत्तेदार श्री.एम.डी.मुंढे यांना विहिरीचे बांधकाम दगडाऐवजी विटामध्ये करण्यास परवानगी देण्यात आली.

विहीरीच्या वीट बांधकामाची रेकॉर्ड एन्ट्री मोजमाप पुस्तिका पृष्ठ क्र.१३ ते १९ वर केलेली आहे. त्याचे एकूण परिणाम १४२.७५ घनमीटर दर्शविले आहे. सदरील परिणाम दुसऱ्या चालू देयकात गोषवाऱ्यात घेवून त्यानंतर सदर बाबीचे प्रदान रद्द केलेले आहे. सदर बाबींच्या बांधकामाची रेकॉर्ड एन्ट्री मोजमाप पुस्तिकेत असताना कोणत्या आधारे ती नोंद रद्द करणे शक्य आहे, याबाबत खुलासा करावा.

उपरोक्त विहीर वीट बांधकामाचे नवीन अंदाजपत्रक रक्कम रु.१,९९,००० चे तयार करुन त्यास दि.१८ जून, १९९९ ला कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेवून श्रमसाफल्य मजूर सहकारी संस्थेला क्र.५४/९९, दि.१७ जुलै, १९९९ द्वारे कामाचे आदेश देवून काम करुन घेतले आहे. त्याचे प्रदान प्र.क्र.१, २/०८/१९९९ रक्कम रु.१,९९,८९२ एवढे केले आहे. सदर कामाची रेकॉर्ड एन्ट्री मोजमाप पुस्तिका क्रमांक १२३७ पृष्ठ क्रमांक ७६ व ७७ वर केलेली आहे. प्रदानाच्या संदर्भात संचिका लेखापरिक्षणास उपलब्ध करुन द्यावी.

विहीर वीट बांधकामची परवानगी मुळ गुप्तेदार श्री.मुंढे यांना देवून त्यांनी सदर बाबीचे काम केल्याची रेकॉर्ड एन्ट्री मोजमाप पुस्तिकेत असताना सदर बाबीचे काम झाले नसल्याचे दर्शवून तेच काम श्रमसाफल्य मजूर सहकारी संस्थेला देवून त्याचेच प्रदान केले आहे. कामाचे प्रदान श्री.मुंढे यांना न करता श्रमसाफल्य मजूर सहकार संस्थेला केले आहे. या अनियमित प्रदानाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

४) विहीरीचे बांधकाम संबंधित गुप्तेदार श्री.मुंढे यांनी केले नसल्याचे दर्शवून त्याचे प्रदान सुध्दा केलेले नाही. परंतु विहीर बांधकामाच्या संदर्भात बाब क्रमांक ३(अ) (ब) आर.सी.सी. रिंग टाकणे, बॉटम रिंग, मिडल रिंग व त्यासाठी बेडींग या बाबीचे काम केल्याचे दर्शवून त्यासाठी रक्कम रु.८४,७४६ प्रदान केले आहेत या बाबींसाठी प्रदान केलेली रक्कम रु.८४,७४६ अधिक ४.९५ टक्के जादा रु.४,१९४ प्रमाणे रक्कम रु.८८,९४० संबंधितांकडून वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

५) मोजमाप पुस्तिका क्रमांक १३९९ पृष्ठ क्रमांक २ व ३ वर बाब क्रमांक २६ व २७ पाईप लाईन खोदकाम १२४० ते १३१० या चेनमध्ये दर्शवून लांबी ६० मीटर दर्शविली आहे. परंतु १२४० ते १३१० या चेनची लांबी ७० मीटर येत असल्याने सॉफ्ट सॉईल खोदकाम सॉफ्ट रॉक खोदकाम व हार्ड रॉक खोदकामाकरिता रक्कम रु.१,३१३ चे जादा प्रदान झाले आहे.

चेन क्रमांक २२२० ते २२८६ ची लांबी ६६ मीटर आहे. परंतु मोजमाप पुस्तिका पान क्रमांक ५ हार्ड रॉकचे खोदकाम लांबी ९० मीटर दर्शविल्यामुळे २४x०.२२५ = ५.४० घनमीटर परिणामाचे रु.१४० प्रमाणे रु.७५६ चे जादा प्रदान झाले आहे.

मोजमाप पुस्तिका पृष्ठ क्रमांक ५ वर पाईप लाईन खोदकाम ०० ते ३० या चेनमध्ये लांबी ३० मीटर येते परंतु, खोदकामाची लांबी ९० मीटर दर्शविल्यामुळे रक्कम रु.४,२७७ चे जादा प्रदान झाले आहे.

वरील पाईप लाईनच्या खोदकामामध्ये एकूण रक्कम रु.६,३४६ वर ४.९५ टक्के जादाचे रु.३१४ प्रमाणे रक्कम रु.६,६६० चे जादा प्रदान संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

६) मोजमाप पुस्तिका पृष्ठ क्रमांक २३ वर बाब क्रमांक ११ डिवॉटरींग याबाबीचे परिमाण ४५०० बीएचपी तास दर्शविले आहे. परंतु पाणी उपसण्यासाठी किती एच.पी.चे किती पंप होते व किती तास चालले याबाबत तपशीलाचे लॉगबुक ठेवलेले नसल्याने डिवॉटरींगचे ४५०० बी.एच.पी. दर्शविलेले परिमाण योग्य असल्याबाबत खात्री पटवावी.

विहीरीचे खोदकाम व बांधकाम दुसऱ्या देयकात पूर्ण दर्शविले असताना अंतिम देयकामध्ये डिवॉटरींग याबाबीचे परिमाण ४५०० अधिक ५०० बी.एच.पी परिमाणाचे रु.१० प्रमाणे रक्कम रु.५,००० अधिक ४.९५ टक्के जादा रु.२४७ प्रमाणे रक्कम रु.५,२४७ संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

७) इ.एम.आर.च्या अंदाजपत्रकात बाब क्रमांक ३ पी.सी.सी. १:३:६ याबाबीचा दर रु.१,४७० दर्शविला आहे. परंतु प्रदान १,७३५ प्रमाणे केल्याने ५.४७ घनमीटर परिमाणाचे रु.२६५ प्रमाणे रक्कम रु.१,४५० अधिक रु.७२ प्रमाणे एकूण रक्कम रु.१,५२२ चे जादा प्रदान झाले असून जादा प्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

८) कामाचे मुळ अंदाजपत्रक रु.१४,९९,००० चे असताना खर्च रु.२१,९३,५४० झालेला आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. परंतु सुधारित तांत्रिक मान्यता घेतलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ११४ नुसार कामाच्या मुळ अंदाजपत्रकापेक्षा कामाचे मूल्य १० टक्केपेक्षा जास्त अथवा रु.१०,०००/- यात जी कमी असेल अशा रक्कमेने वाढ होत असेल तर सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक

मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु तांत्रिक मान्यता न घेता अंतिम प्रदान कसे केले याबाबत खुलासा करावा.

९) अंदाजपत्रकामध्ये पंपिंग मशिनरीचे रक्कम रु.८०,०००/- चे काम प्रस्तावित होते. परंतु सदरील बाबीचे काम केलेले नाही. याबाबत खुलासा करावा.

१०) कामाच्या मोजमाप पुस्तिकेवर मोजमापे नोंदवताना दिनांक कोठेही नमूद केलेला नाही, याबाबत खुलासा करावा.

११) रायझिंग मेनच्या कामामध्ये पाईप लाईनसाठी खोदकाम हार्ड रॉकमध्ये दर्शवून रक्कम रु.१४० प्रमाणे प्रदान केले आहे. परंतु वितरण नलिकेच्या खोदकामामध्ये हार्ड रॉकमध्ये खोदकाम दर्शवून रु.२०० प्रमाणे प्रदान केले आहे. अंदाजपत्रकात रु.१४० हाच दर नमुद आहे. परंतु प्रदान रु.२०० प्रमाणे केले असल्याने ५०७.६० घनमीटर परिमाणाचे रु.६० प्रमाणे रक्कम रु.३०,४५६ अधिक ४.९५ टक्के जादा रु.१,५०८ प्रमाणे रक्कम रु.३१,९६४ चे जादा प्रदान झ ाले आहे. सदर जादा प्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

१२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम १४८(१) नुसार कामाची विहित मुदत संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर गुत्तेदाराने मुदतवाढीचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे व सक्षम प्राधिकाऱ्याने कामाची मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढ मंजूर करुन तसे आदेश काढणे आवश्यक असताना कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २२ डिसेंबर, १९९९ ते ५ मार्च, २००० अशी मुदतवाढ टिप्पणीवर मंजूर केली परंतु टिप्पणीवर दिनांक नाही. गुत्तेदाराचा मुदतवाढीचा अर्ज नाही. त्यामुळे मुळ मुदतीनंतर करार आपोआप संपुष्टात आल्याने त्यानंतर केलेले काम व त्याचे प्रदान नियमबाह्य आहे याबाबत खुलासा करावा.

१३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.जी.आर.ए.पी.ए.पी.यू./१०९३/ सी.आर.६२५/३९ए., दिनांक २५ जानेवारी, १९९४ नुसार पाणीपुरवठा योजनेच्या हैड्रॉलिक टेस्टसाठी १० टक्के रक्कम राखून ठेवून ९० टक्के रक्कम प्रदान करणे आवश्यक असताना सदर कामात हैड्रॉलिक टेस्ट न घेता १०० टक्के प्रदान कसे केले याबाबत खुलासा करावा.

उपरोक्त **आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.**

१) सदरील कामाची निविदा सूचना क्रमांक ७/९८-९९ ही दिनांक २३ नोव्हेंबर, १९९८ च्या दै.सामना व इतर वर्तमान पत्रात प्रसिध्द केली आहे. निविदा स्विकृतीची अंतिम तारीख २३.१२.१९९८ नमुद केली आहे. निविदा प्रसिध्दीचा कालावधी नियमाप्रमाणे योग्य आहे.

२) सदरच्या प्रकरणात उद्‌भव विहिरीची जागा ही स्थानिक नाला काठावर व पृष्ठभागावरील वाळूमिश्रीत काळीमाती असल्यामुळे विहीर खोदकाम करताना माती खाली पडत असल्यामुळे विहिरीचा व्यास पसरुन घेण्यात आलेला आहे. त्यामुळे खोदकामाच्या परिमाणात वाढ झालेली आहे. सदरच्या खोदकामाच्या वेळेस कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन मोजमाप पुस्तिकेवर तपासणीची स्वाक्षरी मोजमाप पुस्तक क्र.१३९९ पान क्र.११ वर केलेली आहे. त्यामुळे झालेल्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन, शासनाकडून शासन निर्णय क्र.ग्रापापु-३००३/ प्र.क्र.२१/पा.पु/०९ दिनांक १४ मे, २००३ अन्वये सुधारीत अंदाजपत्रक व आराखड्यास रक्कम रु.२२.०८ लक्ष करिता सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेतलेली आहे. त्यामुळे वसुलीची आवश्यकता नाही.

३) सदर विहिरीच्या बांधकामासाठी वीट उपयोगात आणली आहे. वीट बांधकामाचे दर मुळ किंवा सुधारीत अंदाजपत्रकात अंतर्भूत नाहीत. तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सदरच्या विहिरीचे वीट बांधकाम करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे विहिरीची भिंत वीटांनी बांधलेली आहे. काँक्रीटची रिंग झाल्यानंतर वीट बांधकाम करणे आवश्यक असते. त्यामुळे वीट बांधकामाची नोंद मोजमाप पुस्तिकेत घेतली आहे. सदरची नोंद गोषवाऱ्यात गृहीत धरली नाही.

या कामाचे देयक रु.१,९९,००० अदा करण्यात आले आहे. वीट बांधकामाची बाब मुळ व सुधारीत अंदाजपत्रकात अंतर्भुत नसल्यामुळे सदर बांधकामाचे अंदाजपत्रक वेगळ्याने मंजूर करुन घेवून श्रमसाफल्य म.स.संस्थामार्फत काम करुन घेतले आहे. सदरचे काम श्री.मुंढे गुत्तेदार यांना देण्यात आलेले नव्हते. सदर आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे दगड बांधकामाऐवजी वीट बांधकाम केलेले आहे. वीट कामाचे देयक पहिल्याच वेळी अंतिमरित्या अदाई केलेले आहे. त्यामुळे अनियमितता झालेली नाही.

४) आक्षेपात नमूद केलेले काम बाब क्र.३-अ व ३-ब हे मुळ अंदाजपत्रकात व सुधारीत अंदाजपत्रकात अंतर्भुत असल्यामुळे सदर बाबींचे काम मुळ गुत्तेदार श्री.मुंढे यांनी केल्यामुळे सदर रक्कम अदा करण्यात आली नाही.

५) आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे जादा प्रदानाची रक्कम रु.६,६६० संबंधीतांकडून वसुल करुन शासन खाती भरण्यात आलेली आहे.

६) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे जादा प्रदानाची रक्कम रु.५,२४७ वसुल करुन शासन खाती भरण्यात आलेली आहे.

७) बाब क्र.३ मध्ये मंजूर निविदेमध्ये १:२:४ मिश्रणाची तरतूद आहे. त्याचे दर रु.१७३५/- आहे त्याप्रमाणे काम केलेले आहे. त्यामुळे जादा अदायी झालेली नाही.

८) सदर कामास महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.ग्रापापु/३००३/प्र.क्र.२१/पापू-९ दिनांक १४ मे, २००३ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता रु.२२.०८ लक्ष दिली आहे व तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता ल.पा./पा.पु. विभाब जि.प., लातूर यांचे आदेश क्र.जिपला/लपावि/डिबी-३/८४८/०३ दिनांक ३१ मे, २००३ रु.२२.०८ लक्ष घेवूनच अंतिम देयक प्रदान केले आहे.

९) सदरच्या अंदाजपत्रकात पंपींग मशिनरीची बाब समाविष्ट आहे. परंतु सदरची बाब यांत्रिकी असल्यामुळे पंपींग मशिनरी वगळता सिव्हिल कामाचे परिशिष्ट-ब केलेले आहे. पंपींग मशिनरीचे काम यांत्रिकी विभागामार्फत झालेले आहे. त्यामुळे या मोजमाप पुस्तिकेत पंपींग मशिनरीची नोंद नाही.

१०) सदर कामाच्या मोजमाप पुस्तिकेवर पहिले धावते देयक दि. १५/३/१९९९ दुसरे धावते देयक दि. ८/६/१९९९ तिसरे धावते देयक दि. ३०/६/१९९९ अंतीम देयक दि. २/२/२००० अशा कामांच्या दिनांकासह नोंदी मोजमाप पुस्तिका क्र. १३९९ मध्ये आहेत.

११) निविदेच्या परिशिष्ठ ब मध्ये रायझिंग मेन मध्ये रु.१४० प्रति घनमीटर दर आहे व वितरण व्यवस्थेमध्ये रु.२०० प्रती घनमीटर दर आहे. स्ट्रॅटा सारखा जरी असला तरी रायझींग मेनचे काम हे गावाबाहेर (हार्ड रॉक बाय ब्लास्टींग) व तसेच वितरण नलिकेचे काम हे गावामध्ये (हार्ड रॉक बाय चिसलींग) असे हे वेगवेगळे काम आहे. त्याप्रमाणे हार्ड रॉक दराची आकारणी निविदेच्या परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेली आहे. त्याप्रमाणेच ठेकेदारास

देयकाची अदायगी झालेली आहे. सदरचे दर हे मंजूर मुळ व सुधारीत अंदाजपत्रकात समाविष्ट आहेत.

१२) कंत्राटदाराने दि. १५/१२/१९९९ च्या अर्जाद्वारे दि.३१/३/२००० पर्यंत मुदतवाढ मागणी केलेली आहे. त्याप्रमाणे विभागीय कार्यालयाने टिप्पणी पान क्र. ९ दि.१६/१२/१९९९ अन्वये कार्यकारी अभियंता यांनी दि.२२/१२/१९९९ ते ५/३/२००० पर्यंत मुदतवाढ मंजूर केली आहे.

१३) सदरील योजनेपासून गावास पाणी पुरवठा सुरळीत होत असल्याची खात्री करुन व योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरीत केल्यानंतरच देयकाची अदायी केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकरी यांची साक्ष :-

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांची दिनांक १ जुलै, २००९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,सदर कामात रुपये १,२३,७७५ इतका खर्च झालेला आहे त्याची वसुली केली आहे काय अशी विचारणा केली असता अतिरिक्त खोदकाम काम झालेले आहे त्यामुळे वसुली करण्यात आली नाही. त्यावर समितीने ९ मीटर नंतर विहीर खोदकामाचा व्यास ६ मीटर घेऊन खोदकाम केलेले आहे. त्यामुळे ० ते ९ मीटरचे खोदकाम अनावश्यकरित्या जादा झालेले आहे. त्यामुळे साधारपणे २५ हजार रुपये जादा खर्च झालेले आहेत. या प्रकरणी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. अशी विचारणा केली असता, त्यावर असा खुलासा करण्यात आला की, एक मीटरचा स्लोप झालेला आहे. सिव्हील इंजिनिअरच्या मॅन्यूअलप्रमाणे दीडास एक हे क्षेत्र आहे. विहिरीची जागा ही स्थानिक नाला काठावर आहे. सदरहू ठिकाणी पृष्ठभागावरील वाळूमिश्रीत काळीमाती असल्यामुळे विहीर खोदकाम करताना माती खाली पडत असल्यामुळे विहिरीचा व्यास मोठा घेण्यात आलेला आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अंदाजपत्रक प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन तयार केलेले नसून घरी बसून तयार केलेले आहे असे एकंदरीत दिसते. वस्तुस्थिती लक्षात न घेता अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे काय, कारण सदरहू कामासाठी प्रस्तावित खर्च रुपये ८९,३०४/- रुपये असतांना तो रु.१,२३,७७५/- इतका खर्च करावा लागला आहे. त्यावर असे सांगण्यात आले की, अंदजपत्रकापेक्षा जास्त काम करावे लागले आहे. विहिरीमध्ये काळी माती आत येत होती म्हणून खालील व्यास कमी करण्यात आला. त्यावर समितीने

विचारणा केली की, काळी माती सात मीटरपर्यंत खाली लागलेली आहे. साईट न बघता अंदाजपत्रक तयार केले. अंदाजपत्रक तयार करतेवेळी साईट बघणे आवश्यक होते. अनु.क्रमांक ८, ९, १०, ११ पर्यंतचे जे विषय आहेत हे सर्व विषय सारखेच आहेत. यामध्ये अनियमितता मोठया प्रमाणावर झालेली आढळून येते. समितीने पुढे पृच्छा केली की, या कामांना मंजूरी देणाऱ्या तांत्रिक अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समंती दर्शविली. समितीने पुढे अशी विचारणा केली की, विहिरीचे बांधकाम दगडाने न करता विटांमध्ये करण्याचे कारण काय आहे? त्यावर असा खुलासा करण्यात आला की, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सदरहू विहिरीचे वीट बांधकाम करण्याच्या सूचना दिल्या होत्या. कॉंक्रीटची रिंग झाल्यानंतर खाली वीट बांधकाम करणे आवश्यक होते, तसेच त्या विहिरीवर दगडाचे काम करणे अत्यंत धोक्याचे होते. विहीर नदीच्या काठावर होती. विहिरीचे खोदकाम चालू केले, त्यानंतर विहिरीला पाणी भरपूर लागले. साडेसात मीटरपर्यंत पक्के खडक लागलेले नव्हते. अशा परिस्थितीत दगडाचे बांधकाम करणे धोक्याचे होते. म्हणून दगडाचे बांधकाम करण्यात आले नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, विहिर अस्तित्वात आहे काय, विहीर अस्तित्वात आहे. परंतु पाणीपुरवठा सध्या बंद आहे असे सांगण्यात आले.

समितीने सदर विहिर केव्हा पूर्ण झाली त्यावर विहिर दिनांक २/२/२००० साली पूर्ण झाली असल्याचे सांगण्यात आले. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, डिघोळ देशमुख पाणीपुरवठा कामातील विहिरीसंदर्भात चौकशी करण्यात यावी आणि दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. सदरहू विहिरीत पाणी आहे किंवा नाही याचीही तपासणी करणे आवश्यक आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर कामाची निविदा कधी काढली व निविदेची जाहीरात कोणत्या वर्तमानपत्रामध्ये दिली होती का ? त्यावर असे सांगण्यात आले की, सदर कामाची निविदा दिनांक २३ नोव्हेंबर, १९९८ ला काढली व त्या निविदेबाबतची जाहिरात "सामना" वर्तमानपत्रामध्ये दिली होती. तसेच इतर वर्तमानपत्रांमध्ये देखील दिली होती. "नवाकाळ", "भूकंप", व "आमचा दंडवत" या साप्ताहिकामध्ये देखील जाहीरात देण्यात आली होती. पुढे समितीने अशी विचारणा केली की, रायझिंग मेनच्या कामामध्ये पाईप लाईनसाठी खोदकाम हार्ड रॉकमध्ये दर्शवून रक्कम रु. १४०/- प्रमाणे प्रदान केले आहे. परंतु, वितरण नलिकेच्या खोदकामामध्ये हार्ड रॉकमध्ये खोदकाम दर्शवून रु.२००/- प्रमाणे प्रदान केले आहे, असे काही आक्षेप लेखा परिक्षणात घेण्यात आले आहेत याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता, असाखुलासा करण्यात आला की, निविदेच्या परिशिष्ट

"ब" मध्ये रायझिंग मेनमध्ये रु. १४०/- प्रति घ.मी. दर आहे व वितरण व्यवस्थेमध्ये रु.२००/- प्रति घ.मी. दर आहे. स्ट्रॅटा सारखा जरी असला तरी रायझिंग मेनचे काम हे गावाबाहेर तसेच वितरण नलिकेचे काम हे गावामध्ये असे वेगवेगळे काम आहे. त्याप्रमाणे, हार्ड रॉक दराची आकारणी निविदेच्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केली असून त्याप्रमाणेच, ठेकेदारास देयकाची अदायगी झाली आहे. सदरचे दर हे मंजूर मूळ व सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ट आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण लेखापरिक्षणाच्यावेळी जाहीरातींची कात्रणे का दाखविली नाहीत,जलस्वराज्य योजनेमध्ये विहिर देत आहात. जलस्वराज्यासाठी किती पैसे खर्च केले, त्यावर जलस्वराज्य योजनेमध्ये तीन गावे आहेत. ही योजना ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची असून डिघोळ देशमुख या एका गावासाठी होती. खर्चाबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध नाही असे सांगण्यात आले व डिघोळ देशमुख, डिघोळ देशपांडे, तांडा यासाठी विहिर पंपघर, रायझिंग मेन याच्या व्यवस्थेसाठी ११.३५ लक्ष रुपयांची योजना प्रस्तावति केली आहे, असे सांगण्यात आले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकाच गावात एकाच कामासाठी दोन योजनांतून पैसे खर्च झालेले आहेत. या संदर्भातील जबाबदारी कोणावर निश्चित करायची, त्यावर असे सांगण्यात आले की, सन २००२ मध्ये ती विहिर पूर्ण झाली. परंतु, त्या विहिरीला सन २००५ पासून पाणी नाही. पहिल्या विहिराला पाणी नसल्यामुळे दुसरी विहिर घेतली. पहिल्या योजनेखाली केलेल्या विहिरीला १८ लाख रुपये आणि दुसऱ्या योजनेखाली केलेल्या विहिरीला १८ लाख असे एकूण ३६ लाख रुपये खर्च झालेला आहे ही बाबत विचारात घेता आता त्या गावाला पाणी आहे का, अशी समितीने विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, जलस्वराज्य योजनेखाली घेतलेल्या विहिरीला पाणी आहे. समितीकडे निवेदन आले असून ३ गावांना पाणी मिळालेले नाही. त्या ठिकाणी दुष्काळामुळे पाणी मिळत नाही की विहिरीला पाणी नाही म्हणून पाणी मिळत नाही. अशी विचारणा समितीने केली असता असे सांगण्यात आले की, उन्हाळ्यात विहिरीचे पाणी कमी होते, पावसाळ्यात पाणी मोठ्या प्रमाणात असते. पहिली विहिर हि दिघाळे देशमुख या गावासाठी होती, जी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून घेण्यात आली होती. त्या विहिरीला पाणी नसल्यामुळे जलस्वराज्य योजनेमधून दुसरी विहिर दिघोळ देखमुख, दिघोळ देशपांडे व देशपांडे तांडा या तीन गावांसाठी घेतली. त्या विहिरला पाणी आहे. पहिल्या विहिरीसाठी २२ लाख रुपये व दुस-या विहिरीला १८ लाख रुपये खर्च आला आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की सन २००५ पासून पहिल्या विहिरीला पाणी नाही असे सांगितले आणि आता पाणी आहे असे सांगत

आहात नक्की काय सांगावयाचे आहे. तसेच सध्या तंत्रज्ञान उपलब्ध आहे. आपण पाणी पाहून विहिर खोदायला हवी होती. १५ टक्के फेलयूअर असताना आपण पाहणी न करता असे का केले . त्यावर असे सांगण्यात आले की, या संदर्भातील एक प्रमाणपत्रात असे म्हटले आहे की, स्त्रोताची जागा तपासून पहिल्या विहिरीपासून ३० मीटर अंतरावर दुसरी विहिर घेण्यात यावी. त्याप्रमाणे विहिर घेण्यात आली आहे. भूजल खात्याच्या सांगण्यानुसार विहिर घेतली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, पहिली विहीर निष्फळ गेली मग त्या ठिकाणी घेतलेल्या रायझिंगमेनच्या कामामध्ये जे जुने पाईप घेतले नाहीत, त्यांचा लिलाव का केला नाही. त्या पाईपांची विक्री न केल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे. त्यावर जिल्हा परिषदेकडून कोणताही खुलासा करण्यात आला नाही. त्यावर समितीने असे निदेश दिले की, लेखापरिक्षणामध्ये बरेचसे आक्षेप घेण्यात आले आहेत. लेखापरिक्षणाच्या वेळी संबंधितांनी कागदपत्रे दाखविली नाहीत, हायड्रोकॉलिक टेस्ट न घेता शंभर टक्के प्रदान केले आहे. कंत्राटदाराला मुदतवाढ दिली आहे. या संदर्भात पूर्ण चौकशी करावी व त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने संबंधितांना दिले.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्दा संदर्भात अधिक माहिती मागविली. डिघोळ देशमुख येथील पाणीपुरवठा योजनेसंदर्भात लेखापरिक्षकांनी घेतलेले आक्षेप, एकाच ठिकाणी दोन विहिरी घेण्यात येणे तसेच साहित्याचा पुर्णवापर इ., संदर्भात संपूर्ण चौकशी करण्याबाबत समितीने निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली.

उपरोक्त मुद्दा संदर्भात जिल्हा परिषदे कडून खालील प्रमाणे माहिती प्राप्त झाली. मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्या कडून सदर प्रकरणाची चौकशी प्रगती पथावर आहे. चौकशी अहवाल दि.७-२-२०११ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालानूसार तत्कालीन कार्यकारी अभियंता (ल.पा.) यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. संबंधितांचा खुलासा प्राप्त झाल्यांनंतर या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल.

विभागीय सचिवांची साक्ष :-

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी तसेच साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने दि.०८ फेब्रुवारी, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने सदर

प्रकरणात दिघोळ देशमुख या एकाच ठिकाणी दोन विहीरी घेणे व साहित्याचा पुर्नवापर करणे, याबाबत संपूर्ण चौकशी करण्याबाबत समितीने जि.प. भेटीच्या वेळी निर्देश दिले होते. त्याअनुंषगाने केलेल्या चौकशीत काय आढळून आले व संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली याबाबत विचारणा केली असता, पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, समितीच्या निर्देशानुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, लातूर यांच्याकडे चौकशी अहवाल सादर केला असून अहवालाची तपासणी सुरु असून त्यानंतर कारवाई करण्यात येईल. त्यावर समितीने सदर अहवाल केव्हा प्राप्त झाला अशी विचारणा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सदर अहवाल दि.०७ फेब्रुवारी, २०११ रोजी प्राप्त झाल्याचे सांगितले. त्यावर समितीने पृच्छा केली की, चौकशीचे आदेश दिल्यानंतरही प्रशासनाकडून कारवाई केली जात नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेतले जात नाही. पर्यायाने शासनाचा क्षत्रिय स्तरावरील प्रशासनावर कोणत्याही प्रकारचा अंकुश राहिलेला नाही, असे दिसून येते. तसेच दोन वर्षांपूर्वी समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली होती. परंतु, चौकशी अहवाल इतक्या विलंबाने सादर केलेला आहे. त्यामुळे अहवालास दोन वर्षाचा विलंब का झाला, याबाबत चौकशी केली पाहिजे. सदर प्रकरणी दोन विहीरी घेण्यात आल्या आहेत काय व त्यास पाणी लागले आहे का, या दोन मुद्दयाबाबत माहिती तपासायची होती. असे असताना सुद्धा प्राथमिक अहवाल सादर करण्यातच ऐवढा विलंब झालेला आहे. त्यामुळे अंतिम अहवाल कधी सादर केला जाईल, असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता त्यावर सचिवांनी विलंब झाल्याची बाब कबूल करुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन समितीला दिले.

समितीने पुढे सदर प्राथमिक अहवालात काय नमूद करण्यात आले आहे, अशी विचारणा केली असता, सांगण्यात आले की, दोन्ही स्त्रोत योग्य आहे असे नमूद करण्यात आले असून दोन वेगवेगळ्या गावांसाठी दोन वेगळ्या विहीरी घ्याव्यात, अशी लोकांची मागणी होती. दिघोळ देशमुख अंतर्गत दिघोळ तांडा व दिघोळ देशपांडे या दोन्ही ठिकाणी विहीरी घ्यायच्या होत्या. त्या दोन्ही गावांना पाण्याची गरज होती व त्याप्रमाणात पाणीपुरवठा होत नव्हता. त्यामुळे दुसऱ्या गावासाठी वेगळा स्त्रोत निर्माण करावा, अशी गावकऱ्यांची मागणी होती. म्हणून दुसरी विहीर खोदण्यात आली व त्या विहीरीस पाणी सुद्धा लागले आहे.

समितीने पुढे विहिरीचे मूळ अंदाजपत्रक ८९ लाख इतके होते. त्यात वाढ होऊन ते १ लाख २४ हजार रुपयापर्यंत गेले. विहिर खोदत असताना काळी माती लागली. त्यामुळे विहीरीचा व्यास कमी करावा लागला. परंतु, त्या जागेची प्रत्यक्षात तपासणी न करता विहीर खोदण्यात आली. वास्तविक पाहता अभियंत्याकडे जागेची संपूर्ण माहिती असणे आवश्यक असते. जागा न पाहता विहीर घेतल्यामुळे मूळ अंदाजपत्रकात वाढ झाली व शासनाचा जादा पैसा खर्च झाला. तसेच दोन वर्षांनंतर म्हणजेच समितीने साक्षीची सूचना विभागाला दिल्यानंतर सदर कामाबाबतचा प्राथमिक अहवाल सादर झाला, असे मत व्यक्त केले. त्यावर सचिवांनी असा खुलासा केला की, विहीरीचा व्यास कमी केल्याबाबत संबंधितांना नोटिस देण्यात आलेली आहे.

समितीने, अहवाल सादर करण्यात दोन वर्षांचा कालावधी लावल्यामुळे संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच चौकशी करण्याचे काम एखादया अधिकाऱ्यांवर सोपविल्यानंतर त्यांनी ते काम किती कालावधीत करावे, यावर काही बंधन आहे का तसेच चौकशी अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत चौकशी करण्याचे काम पूर्ण न केल्यास त्याच्यावर देखील कारवाई होऊ शकते, अशा प्रकारचा संदेश इतर अधिकाऱ्यामध्ये गेला पाहिजे, असे मत व्यक्त केले. सचिवांनी सदर बाब गंभीर असल्याचे मान्य केले व ज्या अधिकाऱ्याने अहवाल देण्यास उशीर लावला त्याच्याकडून खुलासा मागविण्यात येईल, असे सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :-

लातूर जिल्हा परिषदेतील डिघोळ देशमुख येथील कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजनेच्या कामातील झालेल्या अनियमिततेबाबत लेखा परिक्षकांच्या अभिप्रायाच्या संदर्भात जिल्हा परिषदेने केलेला लेखी खुलासा, साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला दिलेली माहिती तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सदर योजनेच्या कामाचे मुळ अंदाजपत्रक रुपये १४,९९,०००/- इतक्या रकमेचे असताना प्रत्यक्षात खर्च मात्र रुपये २१,९३,५४०/- इतका झाला असून या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता घेतली तरी सुधारित तांत्रिक मान्यता घेतली नसल्याचे दिसून येते.

सदर योजनेच्या विहिरीच्या बांधकामासाठी दगडा ऐवजी वीट उपयोगात आणली आहे. मात्र वीट बांधकामाचे दर मुळ किंवा सुधारित अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यात आलेले नाहीत. तत्कालीन

कार्यकारी अभियंता यांनी विहिरीचे बांधकाम वीटांमध्ये करण्याच्या सूचना दिल्याने विहिरीची भिंत वीटांनी बांधली गेली असल्याचे दिसून येते. सदर विहीरीच्या कामास महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय दिनांक १४ मे, २००३ अन्वये रुपये २२.०८ लक्ष इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक ३१ मे, २००३ रोजीच्या आदेशान्वये रुपये २२.०८ लक्ष इतक्या रकमेचे अंतिम देयक प्रदान केले आहे.

लेखापरिक्षकांनी त्यावेळी या योजनेच्या संदर्भात लेखपरिक्षण केले त्यावेळी सदर योजनेच्या संदर्भातील वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेले जाहीर निविदेचे कात्रण उपलब्ध होऊ शकेले नव्हते. सदर योजनेतील विहिरींचे काम स्थानिक नाला काठावर घेतल्याने त्या पृष्ठ भागावरील वाळूमिश्रीत माती खोदकाम करताना खाली पडत असल्याने विहीरीचा व्यास जो सुरुवातीला ९ मीटर होता तो ६ मीटर येऊन खोदकाम केले आहे. सदर विहीर सन २००२ मध्ये पूर्ण झाली परंतु, त्या विहीरीला सन २००५ नंतर पाणी नसल्याने जलस्वराज्य योजनेखाली पहिल्या विहीरीपासून ३० मीटर अंतरावर दुसरी विहीर भूजल खात्याच्या सल्ल्यानुसार खोदण्यात आली आहे. या दोन्ही विहीरींतून डिघोळ देशमुख, डिघोळ देशपांडे व देशपांडे तांडा या तिन्ही गावांना पाणी पुरवठा केला जातो. पहिल्या विहीरीसाठी रुपये २२ लाख व दुसऱ्या विहीरीसाठी रुपये १८ लाखा खर्च आला असल्याचे देखील समितीला सांगितले.

समितीने सदर योजनेच्या संदर्भात घेतलेल्या माहितीवरुन समितीचे समाधान न झाल्याने या प्रकरणी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्याकडून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याबाबत निदेश दिले असता सदर मुख्य अभियंता यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल दिनांक ७/२/२०११ रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तत्कालीन कार्यकारी अभियंता (ल.पा.) यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल असे मागाहून पुरविलेल्या लेखी माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

सबब, **या संदर्भात शासनाने प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाची सखोल व सविस्तर छाननी करुन कामात झालेल्या अनियमिततेबाबत जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती २ माहिन्यात समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषद लातूर (लेखा)
अपूर्ण कामाबाबत : परिच्छेद क्र. ३.५६३

सन २००३-२००४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालात (परिच्छेद क्र.३.५६३)(५३) अपूर्ण कामाबाबत या लातूर जिल्हा परिषदेसंदर्भातील मुद्याबाबत लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

सन २००३-२००४ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणास कार्यकारी अभियंता (ल.पा.) जिल्हा परिषद, लातूर यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीनूसार दिनांक ३१/३/२००४ अखेर कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची रु. १,५६,८६,०००/- ची कामे अपूर्ण आहेत ती पूर्ण करून अनुपालन दर्शवावे. उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद लातूर यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला आहे.

सन २००३-२००४ मध्ये कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्याची एकूण ३१ कामे अपूर्ण होती. त्यापैकी २६ कामे पूर्ण झालेली असून ३ कामे सुरु न झाल्यामुळे व कामावर खर्च निरंक असल्यामुळे तसेच १ काम साठवण तलावाच्या पाळुच्या खाली येत असल्याने रद्द करण्यात आली आहेत. उर्वरीत १ काम प्रगतीपथावर आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांची दिनांक १ जूलै, २००९ रोजी साक्ष घेतली साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, अपूर्ण कामाची सद्यस्थिती काय आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केली की, सन २००३-२००४ मध्ये कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्याची एकूण ३१ कामे होती, त्यापैकी २६ कामे पूर्ण करण्यात आली असून ३ कामे सुरु न झाल्यामुळे व एक कामावर खर्च निरंक असल्यामुळे तसेच एक काम साठवण तलावाच्या पाळुच्या खाली जात असल्याने रद्द करण्यात आले आहे. उर्वरित एक काम प्रगतीपथावर आहे. समितीने पुढे सदर कामे रद्द होण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, कार्यारंभ आदेश देण्यात आल्यानंतरही कंत्राटदाराने काम केले नाही म्हणून सदर कामे रद्द करण्यात आली आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत व त्यांच्यावर आता कोणती कारवाई करण्यात आली आहे. त्यावर असे

सांगण्यात आले की, ज्या कंत्राटदारांनी कामे थांबविली अशा एकूण २२ कंत्राटदारांना काळ्या यादित टाकण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच नवीन डीएसआर प्रमाणे २२ ठेकेदारांवर २५ लाख रुपयांच्या वसुलीची शिफारस केली आहे व त्यापैकी ४ लाख ४ हजार ४९८ रुपये वसूल केले आहेत. त्या सर्व ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यासंदर्भातील प्रस्ताव पाठविला असून जिल्हा परिषद स्तरावर त्यांना काम देणे बंद केले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, जी ४ कामे रद्द केली आहेत त्या कामाची निविदा पुन्हा का काढण्यात आली नाही. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, आर्थिक तरतुदीनूसार व उपलब्धतेनूसार ती कामे सुरु करण्यात येतील. त्यावर समितीने असे विचारले की, जिल्ह्यात एकूण किती कोल्हापूरी पद्धतीचे बंधारे आहेत तसेच बंधाऱ्याची सद्यःस्थिती काय आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला असे सांगितले की, संपूर्ण जिल्ह्यात एकूण २०७ कोल्हापूरी पद्धतीचे बंधारे आहेत.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यासंदर्भात अधिक माहिती मागविली.

१. कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या अपूर्ण कामासंदर्भात संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यास कोणत्या स्तरावर व किती विलंब लागला तसेच सदर विलंबाची कारणे काय आहेत ?

२. सदर अपूर्ण कामास जबाबदार असणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्यास विलंब लावणाऱ्या संबंधितावर देखील कारवाई करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत विभागाचे काय अभिप्राय आहेत. तसेच कारवाई करणे आवश्यक असल्यास, संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात येत आहे ?

उपरोक्त मुद्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१. संबंधीत ठेकेदाराविरुद्ध कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यामध्ये उपविभागीय अभियंता यांचे स्तरावर विलंब झाल्याचे दिसून येते. संबंधीत कामाच्या ठेकेदारा विरुद्ध करावयाच्या कारवाईत झालेल्या विलंबाची माहिती सोबतच्या प्रपत्रात दिलेली आहे. सर्वसाधारणतः संबंधीत कंत्राटदाराकडे पाठपुरावा करुन कामे पुर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापी, कंत्राटदाराने वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे विलंब झाल्याचे दिसून येते.

अपुर्ण ३१ को.प.बंधाऱ्याच्या कामापैकी २६ कामे पूर्ण करण्यात आलेली असून ९२३ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली असल्याने संबंधीत लाभधारकांना याचा फयदा झालेला आहे. ३ कामे सुरु न झाल्यामुळे रद्द करण्यात आलेली आहे व १ काम प्रगतीपथावर असून मार्च २०११ अखेर पूर्ण होवून ४५ हेक्टर सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे.

२. सदरची अपूर्ण कामे पुर्ण करण्यात आलेली असल्यामुळे व सिंचन क्षेत्रात वाढ झाल्यामुळे संबंधितावर कारवाई न होण्याबाबत या विभागाचे मत आहे.

सचिवांची साक्ष :

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी सचिवांनी असा खुलासा केला की, एकूण ३१ कामे अपूर्ण होती त्यापैकी २६ कामे पूर्ण झालेली आहेत. ३ कामे वगळण्यात आलेली आहेत. एक काम प्रगतीपथावर आहे. साठवण तलावाचे एक काम सोडून दिलेले आहे. एकूण २५० लाख रुपये खर्च झालेला आहे. ठेकेदारांनी कामास विलंब केला असल्यामुळे २२ ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याची शिफारस केलेली आहे. सद्यःस्थितीत सन २०१०-२०११ मध्ये ४९ कामे सुरु केलेली आहेत. जुनी अपूर्ण कामे पूर्ण केलेली आहेत. सन १९९१ मध्ये कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आल्यानंतर ठेकेदाराने पाच वर्षे काम केले नाही म्हणून त्यांच्यावर कोणती कारवाई केली अशी विचारणा समितीने केली असता त्यावर असा खुलासा करण्यात आला की, ठेकेदारांनी कामास विलंब केलेला आहे. आधीच्या ठेकेदार रद्द करून दुसऱ्या ठेकेदारास काम दिले. काम न केलेल्या २२ ठेकेदारांची नावे काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव दिनांक ४/६/२००७ रोजी केला असून संबंधित ठेकेदाराकडून रक्कम वसूल केलेली आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, ठेकेदारांनी १९९५ पर्यन्त कामास सुरवात केली नाही. त्यानंतर दोन वर्षानंतर त्यांची नावे काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव सादर केलेले आहे. मधल्या काळात संबंधितावर कारवाई का झाली नाही अशी विचारणा केली असता, खुलासा करण्यात आला की, सन १९८४ ते १९९० पर्यंत प्रशासकीय मान्यता नव्हती. सन १९९० ते १९९५ पर्यंत दोन कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली होती. सन १९९५ ते २००० पर्यंत १४ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली. यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रशासकिय मान्यता नसताना कामाची कार्यारंभ आदेश कसा काय दिला त्यावर जिल्हा परिषद कार्यालयामध्ये विविध प्राधिकरणे आहेत. त्यांच्याकडे कामांच्या किंमतीचे स्लॅब ठरवून दिलेले आहेत.

त्यानुसार कार्यकारी अभियंत्याकडे पाच लाखापर्यंतची कामे सोपविण्यात आली आहेत. पाच लाखांवरील कामे त्याच्या वरच्या अधिकाऱ्याकडे सोपविली आहेत. अशाप्रकारे विभाजन करण्यात आलेले आहे त्यावर समितीने असे विचारले की, एकूण २२ कामांपैकी पाच लाख रुपयांपर्यंतची किती कामे होती, या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार कोणाला आहेत त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, एकूण २६ कामे होती व त्यांची यादी उपलब्ध असून ही सर्व कामे पाच लाख रुपयांवरील असल्याने या कामांना मुख्य कार्यकारी अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेत झालेल्या साक्षीच्या बैठकीमध्ये सदर कामाला दि. २३.१०.१९९१ ला मंजूरी दिली, वर्क ऑर्डर दिली परंतु कंत्राटदाराने ५ वर्षे काम केले नाही असे सांगण्यात आले. कंत्राटदारामुळे झालेल्या नुकसानासंदर्भात त्याला काळ्या यादीत टाकले आहे. परंतु, कंत्राटदाराच्या काम करण्याबाबतच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानाचा हिशेब आपण कसा करणार आहात अशी समितीने विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, वर्क ऑर्डर दिल्यानंतर कंत्राटदाराने काम करण्यात विलंब केलेला आहे. त्यामुळे त्याच्याकडील काम रद्द करून नवीन कंत्राटदाराला काम दिले. पहिल्या कंत्राटदाराने काम न केल्यामुळे दुसऱ्या कंत्राटदाराला काम दिले, यामधील कामाच्या रक्कमेमध्ये जे आर्थिक नुकसान झाले, ते नुकसान पहिल्या कंत्राटदाराकडून वसूल करणे हा त्यातील एक भाग आहे आणि दुसरा भाग म्हणजे कामासंदर्भात कंत्राटदाराकडून जी एफएसडी दिली जाते, ती जप्त करणे हा आहे. त्यानुसार संबंधित कंत्राटदाराची एफएसडीची रक्कम जप्त केली असून सर्व कामनिहाय आकडेवारी उपलब्ध आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, काम करण्यात विलंब झाल्यामुळे कामाचा खर्च वाढला तर वाढलेली रक्कम कंत्राटदाराकडून वसूल केली जाते. कंत्राटदाराने काम वेळेत न केल्यामुळे किंवा कामच न केल्यामुळे झालेले नुकसान किती रकमेचे आहे. त्यावर सचिव, ग्रामविकास यांनी समितीस असे सांगितले की, काम वाढल्यामुळे नुकसान होत असलेली रक्कम ३४ लाख रुपये आहे. उर्वरित सर्व काम दुसऱ्या कंत्राटदाराला दिले आहे व संबंधित कंत्राटदाराकडून ३४ लाख रुपयांपैकी ४ लाख रुपये वसूल देखील केले आहेत. तसेच दोषी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकणे, एफएसडी जप्त करणे, आरआरसी करणे अशा तीन स्टेप्स घेतल्या आहेत. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, एकूण किती कामे आहेत. त्यावर असे सांगण्यात आले की, एकूण २६ कामे आहेत व वसुलीसंदर्भातील प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तसेच, एफएसडीची रक्कम देखील जप्त केली आहे.

सदर ३४ लाख रुपये किती वर्षामध्ये वसूल करणार आहात तसेच ही जबाबदारी कोणाची आहे अशी विचारणा समितीने केली असता. सचिव, ग्रामविकास यांनी असे सांगितले की, अशा कंत्राटदाराकडून व्याज देखील घेण्यात येते. तसेच वेळेप्रसंगी कंत्राटदाराची मालमत्ता देखील अटॅच करतो व त्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यामार्फत करण्यात येत असल्याने त्या संदर्भातील प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविण्यात आला आहे असे सांगण्यात आले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण या संदर्भातील प्रस्ताव केव्हा पाठविला, त्यावर वसुली संदर्भातील प्रस्ताव सन २००७-२००८ मध्येच दाखल केला असून संबंधितांना स्मरणपत्रे देखील पाठविली आहेत असे सांगण्यात आले. त्यावर समितीने असे व्यक्त केले की, या प्रकरणी संबंधित ठेकेदारांवर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. त्यावर सचिव, ग्रामविकास यांनी समितीस अशी माहिती दिली की, ही बाब फौजदारी गुन्ह्याच्या निकषामध्ये बसत नाही. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण फौजदारी गुन्हा कर्मचाऱ्यांच्या बाबत लावतो तर मग कंत्राटदारासंबधी का लावू शकत नाही. त्यावर सचिव, ग्रामविकास यांनी समितीला असे सांगितले की, कामामधील झालेला विलंब, मालमत्ता जप्ती हे दिवाणी प्रकरणांमध्ये येतात, ही बाब फौजदारी गुन्ह्यांच्या निकषांमध्ये मोडत नाही त्यामुळे काळ्या यादीत टाकणे, आरआरसीचा प्रस्ताव देणे अशी कार्यवाही केली असून महसूल विभागाकडे या संदर्भात पाठपुरावा करण्यात येत असून जप्तीची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडूनच होत असते. वसुलीसंदर्भातील प्रस्ताव सन २००७-२००८ मध्येच फार्मेटमध्ये दिलेला आहे. परंतु, अद्याप त्या संदर्भातील उत्तर आलेले नाही. आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयाला स्मरणपत्रे देखील पाठविली आहेत. त्यावर समितीने या संदर्भात जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

समितीने १ मार्च, २०११ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांची साक्ष घेतली व साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लातूर जिल्हा परिषदेने एकूण २२ बंधाऱ्यांची कामे घेतली होती. परंतु, संबंधित ठेकेदारांनी विहित कालवधीत कामे पूर्ण केली नाहीत म्हणून संबंधित ठेकेदारांकडून रक्कम वसूल करण्यासंदर्भातील आरआरसीचे प्रस्ताव सन २००७-२००८ मध्ये जिल्हाधिकारी, लातूर याच्याकडे पाठविण्यात आले आहेत. त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, याबाबतची माहिती समितीला द्यावी. त्यावर जिल्हाधिकारी, लातूर यांनी समितीस अशी माहिती दिली की, लातूर जिल्हा परिषदेकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे एकूण १२ प्रस्ताव प्राप्त झाले होते. तथापि, या प्रस्तावांमध्ये

संबंधित ठेकेदारांच्या जंगम वा स्थावर मालमत्तेचा तपशील देण्यात आला नव्हता. त्यामुळे दिनांक १९/०५/२०१० रोजी तहसीलदार यांनी सदर प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांच्याकडे परत पाठविले होते. त्यानंतर एकूण १२ प्रस्तावांपैकी ८ प्रस्तावांबाबत परिपूर्ण माहिती प्राप्त झाली. शासनाच्या दिनांक २० जानेवारी, १९७५ च्या शासन निर्णयानुसार जप्त करावयाच्या स्थावर मालमत्तेचा तपशील संबंधित यंत्रेणेच्या प्रमुखांनी सटिर्फाय करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित यंत्रणेने शासनाने विहित केलेल्या नमुन्यात हा तपशील जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक होते. परंतु, जिल्हा परिषदेने केवळ कंत्राटदाराचे नावं व पत्ता एवढाच तपशील प्रस्तावात दिला होता. जोपर्यंत मालमत्तेचा तपशील संबंधित अधिकारी सटिर्फाय करून देत नाहीत तोपर्यंत पुढील कारवाई करणे जिल्हाधिकारी कार्यालयास शक्य होत नाही त्यामुळे या प्रकरणामध्ये कारवाई करता आली नव्हती. आतापर्यंत २ प्रकरणात रु.७६,५२४/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने सन २००७-२००८ मध्ये हे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविलेले आहेत. ३ वर्षांचा काळ उलटून गेलेला आहे. पंचायती राज समितीने वसुली संदर्भातील सूचनाही जिल्हा परिषदेला दिलेल्या आहेत. परंतु, अद्याप वसूली झालेली नाही. त्यावर जिल्हाधिकारी, लातूर यांनी समितीस अशी माहिती दिली की, जिल्हा परिषदेने जरी प्रस्ताव सन २००७-२००८ मध्ये पाठविलेले असले तरी शासनाने विहित केलेल्या प्रपत्रात मालमत्तेचा तपशील सटिर्फाय करून पाठविलेला नाही. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रस्ताव पाठविताना तो विहित प्रपत्रात पाठविलेला नाही, ही बाब जिल्हाधिकारी कार्यालयाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषदेला ही बाब केव्हा निदर्शनास आणून दिली. त्यावर जिल्हाधिकारी, लातूर यांनी समितीला अशी माहिती दिली की, वास्तविक पाहता जिल्हा परिषदेने सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक होते. तथापि, हे प्रस्ताव तहसीलदार यांच्याकडे सादर करण्यात आले होते. जिल्हा परिषदेने संबंधित ठेकेदारांच्या मालमत्तेचा तपशील सादर करावा तसेच हा तपशील ज्यांच्याकडे ठेकेदारांची नोंदणी झाली आहे त्यांच्याकडून प्राप्त करून घ्यावी, असे दि. २४/११/२००९ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हा परिषदेला कळविण्यात आले होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ४ प्रस्तावाबाबतची माहिती अद्याप अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांनी समितीला अशी माहिती दिली की, सदर कंत्राटदारांची नोंदणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे झालेली आहे.

त्यांच्याकडून माहिती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेकडून झालेला आहे. तथापि, माहिती मिळालेली नाही. म्हणून जिल्हा परिषदेने कंत्राटदारांच्या पत्त्यांवर आपल्या कनिष्ठ अभियंत्यांना समक्ष पाठवून माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे व यामधून ८ प्रकरणांमधील तपशील मिळविण्यात जिल्हा परिषदेला यश प्राप्त झाले आहे. उर्वरित ४ प्रकरणांमध्ये अशीच कार्यवाही जिल्हा परिषदेने सुरु केली आहे व येत्या १५ दिवसात ती माहिती देखील प्राप्त करून घेवू असेही संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला सांगितले. समितीने अशीही विचारणा केली की, १२ प्रकरणांमधील संपूर्ण रकमेची वसुली मार्च, २०११ अखेर होईल का. त्यावर जिल्हाधिकारी, लातूर यांनी समितीला असे सांगितले की, ८ प्रकरणांमधील कंत्राटदारांना कलम १७८ अंतर्गत संबंधित तहसीलदार यांनी नोटीसा काढल्या असून १५ दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे. या कालावधीत त्यांनी रक्कम न भरल्यास जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. समितीने अशी विचारणा केली की, ८ प्रकरणांमध्ये एकूण किती रक्कम वसूल करावयाची आहे ? त्यावर जिल्हाधिकारी, लातूर यांनी समितीस अशी माहिती दिली की, एकूण १२ प्रकरणांमध्ये ११ लाख, ६७ हजार, १२५ रुपये एवढी रक्कम वसूल करावयाची आहे. ८ प्रकरणांमध्ये ८ लाख ५३ हजार ५८१ रुपये एवढी रक्कम वसूल करावयाची आहे. त्यापैकी रु.७६,५२४/- एवढ्या रकमेची वसूली आतापर्यंत

झालेली आहे. जे ४ अपूर्ण प्रस्ताव आहेत त्यामध्ये ३ लाख, ५३ हजार, ७५० रुपयांची वसूली करावयाची आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जी माहिती आम्हाला भेटीच्या वेळी देण्यात आली होती त्यानुसार ३४ लाख रुपयांची रक्कम वसुली पात्र असल्याचे सांगण्यात आले होते. त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, जिल्हाधिकारी यांनी जी रक्कम सांगितली आहे ती फक्त लातूर जिल्ह्यापुरती मर्यादित आहे. जिल्हा परिषद, लातूर कार्यालयाला इतर जिल्ह्यातील कंत्राटदारांकडूनही रक्कम वसूल करावयाची आहे व ही एकूण रक्कम ३४ लाख एवढी आहे. त्यावर समितीने असे सांगितले की, कंत्राटदार कोणत्याही जिल्ह्यातील असले तरी त्यांनी जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडील कामे घेतली होती व ती अपूर्ण ठेवल्यामुळे जिल्हा परिषदेला तोटा झाला आहे. त्यामुळे लातूर जिल्हाधिकाऱ्यांप्रमाणेच इतर जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवून वसुलीची कारवाई करणे आवश्यक आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, इतर जिल्ह्यातील प्रकरणांमध्ये किती रक्कमेची वसुली करावयाची आहे. त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे सांगितले की, बीड जिल्ह्यातील कंत्राटदाराकडून ३ लाख, ७७ हजार, ६०० रुपये, औरंगाबाद

जिल्ह्यातील एका कंत्राटदाराकडून १ लाख, ५८ हजार, ५३५ रुपये, उस्मानाबाद जिल्ह्यातील २ कंत्राटदाराकडून ३ लाख, ९३ हजार, ६२९ रुपये अशी वसूली करावयाची आहे. त्यावर समितीने असे निदेश दिले की, लातूर जिल्ह्यातील १२ प्रकरणांचा पाठपुरावा मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी करून संपूर्ण वसुली मार्च अखेरपर्यन्त करावी व त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करावा. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, सदर प्रकरणे जुनी आहेत. समितीने हा मुद्दा उपस्थित करुन त्याचा पाठपुरावा केल्यानंतर आता वसुलीची कारावाई अधिकाऱ्यांनी सुरु केली आहे. हे बरोबर नाही. त्यावर जिल्हाधिकरी यांनी वसुलीची कारवाई मे, २०१० पासून सुरु करण्यात आली आहे. पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु, मालमत्तेचा तपशील न मिळाल्यामुळे विलंब झाला आहे असे सांगून समितीने दिलेल्या सूचनेप्रमाणे ३१ मार्च, २०११ अखेर संपूर्ण तपशील मिळविण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करु. या प्रकरणी माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. विलंब झाला आहे, हे आम्ही मान्य करतो. परंतु, संबंधित यंत्रणांकडून माहिती मिळू शकली नाही, ही देखील वस्तुस्थिती आहे असे नमूद केले त्यावर समितीने अशी विचारणा केली की, कंत्राटदाराच्या नावाने जर मालमत्ता नसेल तर रकमेची वसूली कोणत्या पद्धतीने करण्यात येते ? अशा प्रकरणी संबंधित कंत्राटदाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा असे समितीला वाटते. त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, जी वसूलपात्र रक्कम आहे ती अपहाराची रक्कम नसून विलंबाची रक्कम आहे. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करता येईल किंवा कसे, याबाबतचे मार्गदर्शन घेण्यात येईल. मूळ काम कंत्राटदाराने पूर्ण न केल्यामुळे कंत्राट रद्द करून नवीन कंत्राटदारकडून काम पूर्ण करून घेण्यात आले. नवीन कंत्राटदारांनी ही कामे सुधारित दराने स्वीकारले. त्यामुळे पूर्वीचे अंदाजपत्रक व नवीन दर यामधील तफावतीची रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येत आहे. समितीने अशी विचारणा केली की, अगोदरच्या कंत्राटदाराने काम पूर्ण केले असते तर या जादा रकमेचा बोजा शासनावर पडला नसता. शासनाचे नुकसान झाले आहे त्यामुळे ही रक्कम वसूल करणे क्रमप्राप्त आहे. मालमत्तेमधून ही रक्कम वसूल होणार नसेल, कंत्राटदार स्वतःहून ही रक्कम जमा करणार नसतील तर फौजदारी कारवाई व्यतिरिक्त कोणती कारवाई करता येईल ? त्यावर प्रधान सचिव, रो.ह.यो. व जलसंधारण यांनी समितीला अशी माहिती दिली की, सिव्हिल प्रोसिजर कोडनुसार देखील कारवाई करता येईल. कराराचे उल्लंघन कंत्राटदाराने केलेले असल्यामुळे दिवाणी दावा आपण करु शकतो. त्यावर जिल्हाधिकारी, लातूर यांनी समितीस असेही सांगितले की, भारतीय

दंड संहितेमधील विविध कलमांचा उपयोग करुन संबंधितांवर कारवाई करता येवू शकेल. शासकीय मालमत्तेचे नुकसान या अंतर्गत कायद्याचा आधार घेवून खटला दाखल करता येवू शकेल. त्यावर समितीने असे सांगितले की, समितीची एवढीच अपेक्षा आहे की, शासनाचे जे नुकसान झाले आहे ते वसूल झाले पाहिजे. कंत्राटदार एका वेळी अनेक कामे स्वीकारतात. पण ती पूर्ण करीत नाहीत व त्यामुळे योजनांमधील कामे पूर्ण होत नाहीत, शासनाचे आर्थिक नुकसान होते व सामान्य जनता त्या सोयी-सुविधांपासून वंचित राहते. अशा कंत्राटदारांना जरब बसविण्यासाठी कडक कारवाई होणे गरजेचे आहे. आज परिस्थिती बघितली तर जिल्हा परिषदेची अनेक कामे अर्धवट स्थितीत आहेत. त्यावर जिल्हाधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, संबंधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आलेले आहे व शासनाच्या यंत्रणांना त्याबाबतची माहिती कळविण्यात आली आहे. समितीने केलेल्या सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा. असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

लातूर जिल्हा परिषदेकडील अपूर्ण कामांच्या संदर्भात मुख्य लेखापरक्षिकांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सन २००३-२००४ मध्ये कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्यांची एकूण ३१ कामे अपूर्ण होती. त्यापैकी २६ कामे पूर्ण करण्यात आली असून ३ कामे सुरु न झाल्यामुळे व एका कामावर खर्च निरंक असल्यामुळे तसेच एक काम साठवण तलावाच्या पाळुच्या खाली जात असल्याने रद्द करण्यात आले असून उर्वरित एक काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते. ज्या कंत्राटदारांना ही कामे देण्यात आली होती त्या कंत्राटदारांकडील कामे रद्द करण्यात आली असून २२ ठेकेदारांवर २५ लाख रुपयांची वसूली बाबतची शिफारस केली असून त्यापैकी रु.४,०४,४९८/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. या सर्व ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्या संबंधीचा प्रस्ताव पाठविला असून जिल्हा परिषद स्तरावर त्यांना कामे देण्याचे बंद करण्यात आले आहे. असे सर्व असले तरी **२२ ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याबाबतच्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेण्यास दोन वर्षाचा कालावधी लागावा ही बाब ठेकेदारांवर वचक बसण्याच्या दृष्टीने निश्चितच विलंबाने घेतलेला निर्णय आहे अस म्हटल्यास वावगे ठरु नये. संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यास झालेल्या विलंबाबद्दल समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

उक्त ठेकेदारांविरुद्ध आर.आर.सी.चा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. त्यापैकी फक्त १२ प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त झाले असून या प्रस्तावामध्ये ठेकेदारांचा स्थावर व जंगम मालमत्तेबाबतचा तपशील न दिल्यामुळे सदर प्रस्ताव तहसिलदारांनी दिनांक १९/५/२०१० रोजी कार्यकारी अभियंत्यांकडे परत पाठविला होता. त्या १२ प्रस्तावांपैकी ८ प्रस्तावांच्या संदर्भातील माहिती परिपूर्ण असल्याने शासनाने दिनांक २० जानेवारी, १९७५ च्या निर्णयानुसार जप्त करावयाच्या स्थावर मालमत्तेचा सविस्तर तपशील न पाठविता जिल्हा परिषदेने केवळ कंत्राटदाराचे नांव व पत्ता एवढाच तपशिल प्रस्तावात दिल्याने केवळ त्या आधारावर पुढील कारवाई करणे जिल्हाधिकारी कार्यालयाला शक्य होत नसल्याने या प्रकरणी पुढील कारवाई करता आलेली नाही. त्यासाठी जिल्हा परिषदेने कंत्राटदाराच्या पत्त्यावर कनिष्ठ अभियंत्यांना समक्ष पाठवून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असून त्यानुसार ८ प्रकरणांमधील तपशिल मिळविण्यात जिल्हा परिषदेला यश आले असून उर्वरित ४ प्रकरणांमध्ये अशीच कारवाई सुरु असून १५ दिवसांत याबाबतची माहिती प्राप्त करुन घेण्यात येईल असे आश्वासन समितीला संबंधितांनी साक्षीच्या वेळी दिले आहे. या ४ अपूर्ण प्रस्तावांमध्ये एकूण ३,५३,७५०/- रुपये इतक्या रकमेची वसुली करावयाची आहे असेही साक्षीच्या वेळी समितीला सांगण्यात आले होते.

वास्तविक पाहता जिल्हा परिषदेने ज्या ठेकेदारांना २६ कामे दिली होती त्या ठेकेदारांकडून विहित वेळेत त्यांनी कामे पूर्ण न केल्यामुळे त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही एका विशिष्ट कालाधीत पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु, तसे न करता ठेकेदारांना दिलेल्या सवलतीचा त्यांनी एक प्रकारे फायदा घेतला आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. **ठेकेदारांकडून येणे असलेल्या रक्कमा या बीड, औरंगाबाद, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील ठेकेदारांकडून येणे असल्याने जिल्हा परिषदेने या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही त्वरित करुन त्यांच्याकडून येणे असलेल्या रकमेची वसूली करावी व संबंधीत ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्या संदर्भात जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर त्वरित निर्णय घ्यावा व या संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भातील सविस्तर माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

जिल्हा परिषद, अमरावती (लेखा)

यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत काँक्रीट रस्ता व नाली बांधकामातील अनियमितताबाबत.

परिच्छेद क्रमांक ३.१८ :

सन २००३-२००४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र. ६) जिल्हा परिषद, अमरावतीने यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत काँक्रीट रस्ता व नाली बांधकामावर एकूण रुपये १६,६९,९३३/- एवढा खर्च केला आहे. त्याबाबत लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.वि.२००१/प्र.क्र./१९४/पंरास ६ (४) दिनांक २७ ऑगस्ट, २००२ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार ग्रामपंचायत **टाकरखेडा पूर्णा व देऊरवाडा** यांनी १० टक्के लोकवर्गणी जमा केली नसताना त्याचा समावेश या योजनेत केल्याबाबत खुलासा करावा.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम १०४ नुसार प्रस्तावित अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १० टक्के पेक्षा कमी खर्च झाल्यास सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक आहे.

३. काँक्रीट नाली बांधकाम आसेगावच्या बाब क्रमांक १ ते ७ वर अंदाजपत्रकीय परीक्षणापेक्षा जादा खर्च रु. ३१,६७४/- केला असून त्यास कार्यकारी अभियंता यांची मंजुरी घेतलेली नाही. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ४ नुसार जादा खर्चास ग्रामसभेची मंजुरी न घेतल्याने सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

   लाभार्थी हिश्यासह बांधकामाची किंमत रु. ८,९९,१३३/- अनुज्ञेय असताना ग्रा.प.ला रु. ९,१९,९६३/- अदा केल्याने रुपये २०,८००/- चे जादा प्रदानाची वसुली करण्यात यावी.

४. काँक्रीट नाली बांधकाम टाकरखेडा पूर्णा व काँक्रीट रस्ता देऊरवाडा यांनी लोकवर्गणीच्या प्रमाणात अंदाजपत्रक सुधारीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने बाब निहाय खर्चाबाबत सत्यता पडताळता आली नाही.

५. बांधकामावर वापरलेल्या साहित्याचा तपासणी अहवाल उपलब्ध केलेला नाही. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्र. ७ (१) नुसार प्रत्येक विभागाचे प्रमुख अधिकाऱ्याने १०० टक्के कामाची तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम १६८ व १८६ नुसार कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही केलेली नाही. शासन निर्णय मुद्दा क्र. ३ नुसार अंतिम देय ग्रामसभेची शिफारस व कामाचा दर्जा पाहून अदा करावयाच्या असताना ग्रामसभेचा ठराव न घेता अंतिम देयक अदा केल्याबाबत खुलासा करावा.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

१. ग्रा.प.टाकरखेडा पूर्णा व ग्रा.प.देऊरवाडा येथे सन २००३-२००४ मध्ये यशवंत ग्रामसमृद्धी योजना अंतर्गत अनुक्रमे काँक्रीट नाली व काँक्रीट रोडचे काम मंजुर होते. सदर कामाचे अंदाजपत्रक अनुक्रमे रु. ७,६४,४००/- रु. ५,००,०००/- होते. परंतु, अंदाजपत्रकाप्रमाणे लोकवर्गणी जमा झाली नाही. त्यामुळे जमा झालेल्या लोकवर्गणीच्या प्रमाणात सदर कामावर खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला.

अ.क्र.	ग्रामपंचायत	कामाचे स्वरुप	अंदाजपत्रकाची किंमत	जमा झालेली लोकवर्गणी	झालेला खर्च
१.	देऊरवाडा	काँक्रीट रस्ता	५,००,०००	२५,०००	२,५०,०००
२.	टाकरखेडा	काँक्रीट रस्ता	७,६४,४००	५०,०००	५,००,०००

वरीलप्रमाणे ग्रा.प.ला रक्कम अदा करण्यात आली. यामध्ये शासनाचे अनुदानाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.

२. पंचायत समिती लेखासंहिता नियम १०४ नुसार प्रस्तावित अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १० टक्केपेक्षा कमी खर्च झाल्यास सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन घेणे आवश्यक होते. परंतु, तसे ग्रा.पं.नी केले नाही. तथापी ग्रामपंचायतीच्या हिश्याचा किंवा कामाचा शासनाच्या अनुदानावर कोणताही परिणात झालेला आढळला नाही.

३. काँक्रीट नाली बांधकाम आसेगावच्या बाब क्रमांक १ ते ७ वर खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला.

अ.क्र.	कामाचे स्वरुप	अंदाजपत्रकातील तरतुद परिणाम	प्रत्यक्ष झालेल्या कामाचे परिणाम	कमी	जास्त
१.	खोदकाम	१०८३.३०	१०८६.५५	----	३.२५
२.	पायामध्ये खडी व कठीण मुरुम	२०२.८०	२३३.३९	----	३०.५९
३.	पायामध्ये रेती भराई	८१.२०	१६७.४९	----	८६.२९
४.	पायामध्ये सिमेंट काँक्रीट टाकणे	१५२.१०	२९४.४८	----	१४२.३८
५.	नालीच्या भिंती बांधणे	२९३.२०	४२०.५९	----	१२७.३९
६.	नालीच्या नळात काँक्रीट टाकून उतार काढणे	३२४.००	१४.०१	३०९.९९	----
७.	नालीवर आवश्यक ठिकाणी काँक्रीट स्लॅब टाकणे	९.४७	६७.९८	----	५८.५१

सदर बाब क्रमांक १ ते ७ अंदाजपत्रकातील परिणामापेक्षा प्रत्यक्ष कामाचे परिणाम जास्त आहे. परंतु, सदर बाबीवर झालेला खर्च हा प्राकलनाच्या किंमतीपेक्षा जास्त झालेला नाही व सदर कामाचे परिणाम हे प्रत्यक्ष साईटवर कामाचे पाहणी करुन घेण्यात आलेत व अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा सदर कामावर जास्त खर्च न झाल्यामुळे ग्रामसभेची मंजुरी घेण्यात आली नाही.

लाभार्थी हिश्यासह मंजूर रक्कम रु. ९,३२,७००/- होती त्यामध्ये १० टक्के लोकवर्गणी रु. ९३,२७०/- शासनाकडून घ्यावयाचा निधी एकूण रु. ८,३९,४३०/- असा एकूण रु. ९,३२,७००/- सदरहू कामाची किंमत होती. त्यामुळे परिच्छेदात नमुद केलेली रक्कम वसूल पात्र नाही.

४. काँक्रीट नाली बांधकाम टाकरखेडा पूर्णा व देऊरवाडा ग्रा.प.नी शासकीय व तांत्रिक मंजुराती नुसार व १० टक्के लोकवर्गणीच्या पूर्ण भरणा केला. लोकवर्गण्ीच्या प्रमाणात व मोजमाप पुस्तीकेनुसार परिक्षण करुन बाबनिहाय खर्चाची सत्यता पडताळून रक्कम अदा करण्यात आले.

५. सदर बांधकामावर वापरलेल्या साहित्याचे तपासणी अहवाल घेण्यात आलेला नव्हता परंतु, सदर काम करीत असताना संबधीत शाखा अभियंता यांनी सदर कामाच्या फील टेस्ट घेतलेल्या आहेत. त्याचप्रमाणे उप कार्यकारी अभियंता, तांत्रिक अधिकारी यांनी सदर कामावर वेळोवेळी भेटी देऊन पाहणी केलेली आहे. तसेच उपविभागीय अभियंता यांनी १०० टक्के कामाचा दर्जा पाहूनच काम पुर्णत्वाचा दाखला दिला व काम पुर्णत्वाचा दाखला पं.स.ला प्राप्त झाल्यानंतरच अंतिम देयक अदा करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांची दिनांक ५ ऑगस्ट, २००९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अशी विचारणा करण्यात आली की, यशवंत ग्रामसमृद्धी योजने अंतर्गत घेण्यात आलेल्या काँक्रीट रस्त्यांच्या कामांवर जास्त खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. यामध्ये १० टक्के लोकवर्गणी जमा करण्याची अट होती त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे काय, त्यावर असा खुलासा करण्यात आला की, देऊरवाडा व टाकरखेडा या ग्रामपंचायतीमध्ये अनुक्रमे ५,००,०००/- व ७,६४,०००,/- रुपयांची रस्यांची कामे करावयाची होती. अंदाजपत्रकाप्रमाणे लोकवर्गणी जमा

झालेली नव्हती. जेवढी लोकवर्गणी जमा झाली त्याप्रमाणात रस्त्यांच्या कामावर खर्च करण्यात आलेला आहे. त्यावर समितीने अशी पृच्छा केली की, लोकवर्गणी जमा झाली नाही तर सदर काम सुरु करता येत नाही. लोकवर्गणी जमा न करता काम कसे काय सुरु करण्यात आले त्यावर जेवढी लोकवर्गणी जमा झाली होती. त्या प्रमाणात काम करण्यात आले असा खुलासा करण्यात आला. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, १० टक्के लोकवर्गणी जमा झाल्याशिवाय काम सुरु करता येत नसतानाही सर्व नियम बाजूला ठेऊन कामे करण्यात आली आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की, मागासवर्गीय परिसरातील दलित वस्त्यांमधील हे रस्ते आहेत त्यासाठी १० टक्के लोकवर्गणीची अट आहे. त्यानुसार दलित वस्तीतील जनतेकडून १० टक्के लोकवर्गणी घेण्यात आलेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे लोकवर्गणी जमा व्हावयास पाहिजे होती त्याप्रमाणे लोकवर्गणी जमा झालेली

नाही. ज्याप्रमाणात लोकवर्गणी जमा झालेली आहे त्या प्रमाणात रस्त्यांची कामे करण्यात आलेली आहेत.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, अहवालामध्ये रु. २५,०००/- लोकवर्गणी जमा झाल्याचे नमूद केलेले आहे. या रकमेमध्ये किती लोकांचा सहभाग आहे. प्रत्येकाने किती रक्कम भरलेली आहे याबाबतचा सविस्तर तपशील नसल्याने लोकवर्गणीची रक्कम अंदाजे दाखविलेली आहे व सदर रक्कम एजन्टने भरलेली आहे. अशी शंका येण्यास वाव आहे असे समितीला वाटते.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यासंदर्भात अधिक माहिती मागविली.

१. लेखा परिक्षणात ग्रामपंचायत टाकरखेडा पूर्णा व देऊरवाडा यांनी १० टक्के लोकवर्गणी जमा केली नसताना त्यागावातील कामाचा समावेश का करण्यात आला असा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. परंतु, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीत सदर गावाकडून लोकवर्गणी पोटी जमा झालेली रक्कम रु. २५,०००/- दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी नेमका कोणाचा दोष आहे हे सिद्ध होत नसल्याने या प्रकरणाचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

२. सदर योजनेअंतर्गत जमा झालेल्या लोकवर्गणीच्या प्रमाणात संपूर्ण हिस्सा जमा झाल्यानंतरच काम सुरु करता येते किंवा कसे तसेच लोकवर्गणीच्या प्रमाणात काम करण्यात आल्याने सदर योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाच्या गुणवत्तेवर देखील परिणाम होण्याची शक्यता आहे, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? याबाबत शासननिर्णय तसेच मार्गदर्शक तत्वे काय आहेत ?

उपरोक्त मुद्यासंदर्भात जि.प.कडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

ग्रामविकास जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.य.ग्र.वि.-२००१/प्र.क्र.१९४/पंरा.-६ (४७) दिनापंक २७ ऑगस्ट, २००२ नुसार योजने अंतर्गत प्रस्तावीत कामाच्या १५ टक्के लोकवर्गणीच्या (सर्वसाधारण) व दलीत वस्तीमधील कामासाठी १० टक्के लोकवर्गणी ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे जमा केल्यानंतर आवश्यक अनुदान ग्रामपंचायतीला वितरीत करणे आवश्यक होते. परंतु, ग्रामपंचायत टाकरखेडा पुर्णाने नाली बांधकामची प्राकलननिहाय किंमत रु. ७,६४,७००/- च्या १० टक्के

म्हणजे रु. ७६,७४०/- इतकी लोकवर्गणी जमा करणे आवश्यक होते. परंतू ग्रामपंचायतीने रुपये ५०,०००/-लोकवर्गणी जमा करुन रु. ५.०० लक्ष चे काम केले आहे तसेच ग्रामपंचायत देऊरवाडा येथील काँक्रीट रस्ता बांधकामाची प्राकलनीय किंमत रु. ५.०० लक्ष च्या १० टक्के म्हणजे रु. ५०,०००/- लोकवर्गणी जमा करणे आवश्यक होते. परंतु, ग्रामपंचायत टाकरखेडा पुर्णाने रु. २५,०००/- इतकी लोकवर्गणी जमा करुन रु. २.५० लक्ष चे काम केले.

ग्रामपंचायतीकडे अंदाजपत्रकाप्रमाणे लोकवर्गणी गोळा झाल्यावर सदर ग्रामपंचायतीचा योजनेत समावेश करावयास पाहिजे होता किंवा सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेवून कार्यवाही करावयास पाहिजे होती. यास गट विकास अधिकारी पंचायत समिती, ग्रामपंचायतीचे सचिव, शाखा अभियंता, सहा.लेखा अधिकारी हे जबाबदार आहेत. त्यामुळे श्री.पी.एन.भुंबरकर तत्कालीन सचिव ग्रामपंचायत टाकरखेडा पुर्णा, आसेगाव पुर्णा व श्री.मिलींद कांबळे, शाखा अभियंता यांची अनुक्रमे आदेश क्रमांक जि.प./पंचायत/चौकशी/६२८२ दि. १०/५/२०१० व आदेश क्र. ३५५५ दि. १०/५/२०१० अन्वये एक वेतनवाढ पुढील वेतन वाढीवर परिणामकारक न ठरविता एक वर्षाकरिता थोपविण्यात आलेली आहे व श्री.अरुण मेश्राम, तत्कालीन स.ले.अ. यांचेवर आदेश क्र. २७७४ दि. १३/५/२०१० अन्वये ठपका ठेवण्यात आलेला आहे. तसेच तत्कालीन गट विकास अधिकारी, श्री.ठाकरे व श्री.दिवाण यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आलेला आहे. त्यांचे कडील खुलासा प्राप्त होताच त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. शासन निर्णय क्र.पू.ग्रा.वि.२००१/प्र.क्र./१९४/पंरास ६ (४७) दिनांक २७ ऑगस्ट, २००२ मध्ये योजनेच्या अंमलबजावणी गुणवत्ता इत्यादीबाबत माहिती दिली आहे. तसेच लोकवर्गणीच्या प्रमाणात ग्रामपंचायत टाकरखेडा पूर्णा व देऊरवाडाला यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत प्रथम अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

सचिवांची साक्ष :

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दि. २१ फेब्रुवारी, २०११ रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. समितीने विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन केल्यानंतर अशी विचारणा केली की, अनुपालन अहवालामध्ये श्री.अरुण मेहता तत्कालीन स.ले.अ. यांचेवर आदेश क्र. २७७४ दि. १३/५/२०१० अन्वये ठपका ठेवण्यात आलेला आहे. तसेच तत्कालीन गट विकास अधिकारी श्री.दिवाण यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आलेला आहे. त्यांचेकडील खुलासा

प्राप्त होताच त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. असे लेखी खुलाशात नमूद करण्यात आले. परंतु, संबंधिताना नोटीस मे, २०१० मध्ये देण्यात आलेली असताना अद्यापर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. याबाबत खुलासा करताना सचिव ग्रामविकास विभाग यांनी असे सांगितले की, खुलासा १५ दिवसात दिला पाहिजे. ग्रामपंचायतीकडून पूर्ण १० टक्के लोकवर्गणी जमा व्हावयास पाहिजे होती ती झ ालेली नव्हती म्हणून गटविकास अधिका-याला दि. १ फेब्रुवारी, २०११ ला पत्र देण्यात आले आहे. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, समितीची साक्ष लागल्यानंतर गटविकास अधिका-याला पत्र देण्यात आले आहे. गटविकास अधिका-याला इतके दिवस पत्र का पाठविण्यात आले नाही. पत्र पाठविण्यास इतका विलंब का लागला त्यावर असे सांगण्यात आले की, दोषी कर्मचाऱ्यांवर अगोदर कारवाई केल्यानंतर गटविकास अधिकारी यांच्यावरील कारवाईसाठी पत्र पाठविण्यात आले आहे. १० टक्के लोकवर्गणीचे पैसे जमा केल्यानंतर संबंधित अभियंत्याने करण्यास सांगावयास पाहिजे होते ती त्यांची मुख्य जबाबदारी होती. तसेच लेखा अधिकाऱ्याने १० टक्के लोकवर्गणी जमा झाले की नाही हे पहावयास पाहिजे होते. या सगळ्यांकडून गटविकास अधिकाऱ्याकड नस्ती आल्यानंतर त्यांनी हप्ता अदा केला. गट विकास अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी टाळू शकत नाहीत म्हणून त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीकडे अंदाजपत्रकाप्रमाणे लोकवर्गणी गोळा झाल्यावर सदर ग्रामपंचायतीचा योजनेत समावेश करावयास पाहिजे होता किंवा सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेऊन कार्यवाही करावयास पाहिजे होती. परंतु, तसे झालेली नाही. याबाबीस गट विकास अधिकारी पंचायत समिती, ग्रामपंचायतीचे सचिव, शाखा अभियंता, सहा.लेखा अधिकारी हे जबाबदार आहेत. त्यामुळे श्री.भुंबरकर, तत्कालीन सचिव, ग्रामपंचायत टाकरखेडा पूर्णा, आसेगाव पूर्णा व श्री.मिलिंद कांबळे, शाखा अभियंता याची एक वेतनवाढ पुढील वेतन वाढीवर परिणामकारक न ठरविता एक वर्षाकरिता थांबविण्यात आलेली आहे. श्री.अरुण मेश्राम, तत्कालीन स.ले.अ. यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. तसेच, तत्कालीन गट विकास अधिकारी, श्री.ए.डी.ठाकरे व श्री.बी.डब्ल्यू.दिवाण यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आलेला आहे व पुढे असा खुलासा केला की, शासननिर्णयाच्या विरुद्ध जाऊन स्वतःच्या स्तरावर हे काम करुन घेतले ते चुकीचे आहे म्हणून त्यांना शिक्षा करण्यात आलेली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, जेवढे पैसे जमा झाले तेवढेच काम झालेले दिसते उरलेले पैसे परत केले गेले का त्यावर असा खुलासा करण्यात आला की, ग्रामपंचायत टाकरखेडा पूर्णाने नाली बांधकामची किंमत रु.

७,६४,७०००/- च्या १० टक्के म्हणजे रु. ७६,७४०/- इतकी लोकवर्गणी जमा करणे आवश्यक होते. परंतु, ग्रामपंचायतीने रु. ५०,०००/- लोकवर्गणी जमा करुन रु. ५.०० लक्षाचे काम केले. परंतु, अगोदर सर्व लोकवर्गणी जमा करायला हवी होती त्यानंतरच काम करायला हवे होते. तसे केले नाही म्हणूनच त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

अभिप्राय व शिफारशी :

यशवंत ग्रामसमृद्धी योजनेतंर्गत लोकवर्गणीची रक्कम जमा झाल्यानंतरच कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाचा समावेश योजनेत करणे आवश्यक होते. परंतु, तसे न करता ग्रामपंचायत टाकरखेडा पूर्णा व देऊरवाडा येथील कामांचा समावेश सदर योजनेत करण्यात आल्याबाबतचा आक्षेप लेखापरिक्षणात घेण्यात आला होता. परंतु, जिल्हापरिषदेमार्फत सदर कामाचे समर्थन करताना असे सांगण्यात आले की, वर्गणी ज्याप्रमाणात जमा झाली त्याप्रमाणात काम करण्यात आले आहे व त्यामुळे शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. **जिल्हा परिषद, अमरावतीमार्फत करण्यात आलेल्या लेखी खुलाशावरुन असे दिसून येते की, एकतर शासन निर्णयाचे उल्लंघन जिल्हापरिषदेमार्फत करण्यात आले व दुसरे केलेल्या कृतीचे समर्थन देखील करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, अमरावतीला शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याची देखील जाणीव झालेली नाही असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.**

पंचायती राज समितीने जिल्हापरिषद अमरावतीला भेट देऊन संबंधितांची साक्ष घेतली त्यावेळी सदर बाब संबंधितांच्या निदर्शनास आणली तेव्हा संबंधित गट विकास अधिकारी, ग्रामपंचायतीचे सचिव, शाखा अभियंता, सह.लेखा अधिकारी जबाबदार असल्याची लेखी कबुली विभागामार्फत करण्यात आली असून संबंधितावर कारवाई करण्यात आलेली आहे. **समितीने जर जिल्हापरिषदेला भेट देवून सदर प्रकरणी साक्ष घेतली नसती तर जिल्हा परिषदेने सदर कामात केलेली कृती ही बरोबर आहे. या अविभावात जिल्हापरिषद राहिली असती व केलेले चूकीचे काम बरोबरच आहे ही जिल्हापरिषदेची भूमिका आणखी दृढ झाली असती व अशा प्रकरची कार्यपद्धती जिल्हा परिषद प्रशासनात वाढीस लागणे निश्चितच धोकादायक असून जिल्हा परिषद प्रशासनामार्फत शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे पालन काटेकारपणे करणे आवश्यक आहे. शासनामार्फत वेळोवेळी शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना त्यातील अटी व शर्तीचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे याबाबत वेळोवेळी सूचना केलेल्या असतात, जिल्हा परिषद प्रशासनामार्फत काहीवेळेस जाणीवपूर्वक अशा सूचनांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. जिल्हा परिषद, अमरावतीमार्फत देखील सदर**

अनियमिततेचे ज्यापद्धतीने समर्थन केले आहे त्यावरुन देखील असेच दिसून येते. सबब शासनाने यशवंत ग्रासमृद्धी योजनेची अंमलबजावणी करताना ज्या ज्या ठिकाणी नियमाचे व निकषांचे पालन झ ालेले नाही असे जिथे जिथे आढळून आले त्या त्या ठिकाणच्या कामाचा आढावा घेवून सदर योजनेच्या अंमलबलजावणीत अनियमितता करणाऱ्या संबंधितावर योग्य ती कारवाई करावी अशी शिफारस समिती करीत असून त्याबाबतची माहिती समितीला सहा महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

परिशिष्ट

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी, २००९
स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, धुळे

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.

३. श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

४ ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.

५ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

६ श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.

७ श्री.विक्रम काळे, वि.प.स.

८ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.म.सु.वाघमारे, समिती अधिकारी

मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :
श्री.अ.बा.सावंत, संचालक तथा मुख्य लेखा परीक्षक

विभागीय **प्रतिनिधी :**
श्री.र.ना.अंबरित, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
श्री.के.एस.कांबळे, अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

धुळे जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. दिपेंद्र सिंह कुशवाह, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.ज्ञा.द.शिंदे, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.श्याम भोकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
४. श्री.मिलिंद धांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
५. श्री.दिलीप रुपवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) (प्रभारी)
६. श्री.सोमनाथ बनसोडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
७. श्री.ह.ना.कोकणी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
८. श्री.गोकुळ बागले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

९. श्री. भगवान सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१०. श्री.आर.टी.नागे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
११. श्री.जितेंद्र गाढे, अधिक्षक (शापोआ, प्राथमिक)
१२. श्री.सुधाकर सांगळे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
१३. श्री.शिं.गं.शिंदे, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन विभाग)
१४. श्री.पंढरीनाथ पाटील, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)
१५. डॉ.मधुकर पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
१६. श्री.शांताराम मालपुरे, कृषी विकास अधिकारी व जिल्हा कृषी अधिकारी
१७. डॉ.अरविंद गंधे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
१८. श्री.सतीश वळवी, समाजकल्याण अधिकारी
१९. श्री.दिलीप रुपवते, गट विकास अधिकारी, धुळे
२०. श्री.भीमराव पाटील, गट विकास अधिकारी, साक्री
२१. श्री.चिंधा सोनावणे, गट विकास अधिकारी, (प्रभारी), शिंदखेडा
२२. श्री.तुषार माळी, गट विकास अधिकारी, शिरपूर
२३. श्री.जी.टी.महाजन, लेखा अधिकारी
२४. श्री.आर.बी.पाटील, उपायुक्त (वि), आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
२५. श्री.अरविंद वळवी, तत्कालीन समाजकल्यण अधिकारी/सहाय्यक आयुक्त अपंग कल्याण, पुणे
२६. श्री.डी.आर.बारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदूरबार
२७. श्री.बी.एन.भापरे, माजी उपमुख्यं कार्यकारी अधिकारी (बा.क.)
२८. श्री.वाय.के.सासोटे, माजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
२९. श्री.अशोक मोकदम, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती
३०. श्री.एस.एस.जगताप, तत्कालीन जिल्हा कृषी अधिकारी/कृषी अधिकारी, अहमदनगर

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने धुळे जिल्हापरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील धुळे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १ जुलै, २००९

स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, लातूर

उ प स्थि ती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

२. श्री.राजन पाटील, वि.स.स.

३. श्री.संपतराव गणपत अवघडे, वि.स.स.

४. श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

५. श्री.सुभाष बने, वि.स.स.

६. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.

७. श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

८. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

९. श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.

१०. श्री.हेमंत पटले, वि.स.स.

११. श्री.राजन तेली, वि.प.स.

१२. श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

१३. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.म.सु.वाघमारे, समिती अधिकारी

ग्राविकास विभाग, मंत्रालय

श्री.एकनाथ मोरे, उप सचिव

मुख्य लेखापरिक्षक यांचे कार्यालल

श्री.शंकरराव चव्हण, प्रभारी मुख्य लेखापरिक्षक

२/-

..२..

लातूर जिल्हा परिषदेचे अधिकारी

१. डॉ.प्रवीण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी,
२. श्री.सूर्यकांत हजारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
३. श्री.गिरीष भालेराव, प्रकल्प संचालक,
४. श्री.परमेश्वर राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
५. श्री.किरण जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
६. श्री.शिवाजी पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.),
७. श्री.राजकुमार मुक्कावार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य),
८. श्री.बिभीषण तांबडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
९. श्री.द्वारकादास नोगजा, कार्यकारी अभियंता (ल.पा.),
१०. श्री.योगेश कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (बां.),
११. श्री.विजय भरगंडे, कृषि विकास अधिकारी,
१२. श्री.राम होनमाने, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथ.),
१३. श्री.लव डुरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य.),
१४. डॉ.लक्ष्मण पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
१५. डॉ.रावसाहेब वाघमारे, जिल्हा आरोग्य अधिकारी,
१६. श्री.लक्ष्मण वाघमारे, समाजकल्याण अधिकारी, जि.प.,
१७. डॉ.संजय तुबाकले, गटविकास अधिकारी, लातूर, पं.स.,
१८. श्री.प्रभाकर कदम, गटविकास अधिकारी,औसा,पं,स,.
१९. श्री.वसंत वाघमारे, गटविकास अधिकारी, निलंगा, पं.स.,
२०. श्री.शाम पटवारी, गटविकास अधिकारी, शिरुर अ.,पं.स.,
२१. श्री.नितीन दाताळ, गटविकास अधिकारी, देवणी, पं.स.,
२२. श्रीमती उषा बिरादार, गटविकास अधिकारी, उदगीर, पं.स.,
२३. श्री.शिवानंद खंदारे, प्रभारी गटविकास अधिकारी, जळकोट, पं.स.,
२४. श्रीमती कल्पना क्षीरसागर, गटविकास अधिकारी, अहमदपूर, पं.स.,
२५. श्री.तुकाराम नवले, गटविकास अधिकारी,चाकूर, पं.स.,
२६. श्री.तारु चव्हाण, गटविकास अधिकारी, रेणापूर, पं.स.,

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने लातूर जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील लातूर जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २००९
स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री.राजन पाटील, वि.स.स.
३. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
४. श्रमती अनुसया खेडकर, वि.स.स.
५. श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.
६. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
७. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव
श्री.म.सु.वाघमारे, समिती अधिकारी

मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी (लेखा),
श्री.माणिक कौरथी, लेखापरिक्षक

विभागीय प्रतिनिधी
ग्रामविकास विभाग
श्री.एकनाथ मोरे, उप सचिव
श्री.यशवंत गायकवाड, अवर सचिव

अमरावती जिल्हा परिषदेचे अधिकारी

१. श्री.ओमप्रकाश बकोरिया, मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री.के.एम.अहमद, अतिरिक्त मुख्या कार्यकारी अधिकारी

३. श्री.बी.जी.सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

४. श्री.बी.डब्ल्यू.दिवाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)

५. श्री.एन.बी.यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.)

६. श्री.एस.जी.शिंदे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

७. श्री.एम.एच.हुसैन, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

८. डॉ.के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी,

९. श्री.पी.जी.भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

१०. श्री.आर.के.भगत, कार्यकारी अभियंता (पाटबंधारे)

११. श्री.एम.सी.वाय.शाह, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

१२. डॉ.एस.जी.चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१३. श्री.पी.पी.निकास, शिक्षणाधिकारी (प्रा.)

१४. श्री.एस.के.पवार, शिक्षणाधिकारी (मा.)

१५. श्री.वि.वि.चवळे, कृषी विकास अधिकारी

१६. श्री.एस.एच.शहाणे, समाज कल्याण अधिकारी

१७. श्री.पी.डी.चौधरी, उप अभियंता

१८. श्री.सुनिल निकम, गट विकास अधिकारी, पं.स.तिवसा

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने अमरावती जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील अमरावती जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

सोमवार दिनांक १५ नोव्हेंबर, २०१०
स्थळ : विधान भवन,मुंबई

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.
३) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
४) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.
५) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
६) श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.
७) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
८) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी (लेखा
श्री.शं.धे.चव्हाण

विभागीय प्रतीनिधी
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०११
स्थळ : विधान भवन,मुंबई
उ प स्थि ती

(१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. हणमंतराव पाटील बेटमागरेकर, वि.स.स.
(३) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(४) श्री. बच्चू ऊर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.
(५) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
(६) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
(७) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
(८) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
मुख्य लेखा परीक्षक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
(१) श्री. के.एम.विधाते, मुख्य लेखा परीक्षक
(स्थानिक निधी लेखा)

ग्रामविकास व जलसंधारण विभाग
श्री.व्ही.गिरीराज,प्रधान सचिव (रो.ह.यो व ज.सं.)
श्री. सुधीर ठाकरे, सचिव (ग्रामविकास व पंचायत राज)

जिल्हा परिषद, लातूर
श्री. एस.पी सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ. हेमंत वसेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. गुलाबसिंह राठोड, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
श्री. प्र.मु. दीक्षित, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
श्री. सतिशचंद्र सुशीर, कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा)
श्री. विलास जोशी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
डॉ. एम.यू. गोहत्रे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य

विभाग, प्रधान सचिव नियोजन विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग, सचिव, कृ.प.दु.म. व सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार दिनांक २१ फेब्रुवारी, २०११

स्थळः विधान भवन, मुंबई.

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. समिती प्रमुख
२) ॲड.के.सी.पडवी, वि.स.स.
३) श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.
४) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
५) श्री.बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.
६) श्री.बापूसाहेव पाठारे, वि.स.स.
७) प्रा.सुरेभाऊ लाड, वि.स.स.
८) डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.
९) प्रा.सुरेश खाडे, वि.स.स.
१०) श्री.अनिल राठोड, वि.स.स.
११) श्री.दादाजी भुसे, वि.स.स.
१२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
१३) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१४) ॲड.उषा दराडे, वि.प.स.
१५) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय -
(१) श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव.
(२) श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

मुख्यलेखा परीक्षक, स्थानिक निधी (लेखा)
श्री.के.एम.विधाते, मुख्य लेखा परीक्षक, मुंबई

विभागीय प्रतीनिधी
श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
श्री.यु.के.खोब्रागडे, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
श्री.जयंत बाँटिया, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग
श्री.ओमप्रकाश बकोरिया, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
डॉ.अर्चना पाटील, सह संचालक, आरोग्य सेवा संचनालय, मुंबई

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०१ मार्च, २०११

स्थळः विधान भवन, मुंबई.

उ प स्थि ती

(१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

(३) श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

(४) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

(५) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

(६) श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

(७) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

(८) श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक कार्यालय, नवी मुंबई

(१) श्री. के.एम.विधाते, मुख्य लेखा परीक्षक

जलसंधारण विभाग, मंत्रालय

(१)श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

(१) श्री. एकनाथ डवले, जिल्हाधिकारी

जिल्हा परिषद, लातूर

(१) श्री.सचीद्र प्रताप सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) डॉ.हेमंत वसेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. सतिश सुषीर, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

दिनांक - २० डिसेंबर, २०११
स्थळ : विधान भवन, नागपूर
उपस्थिती

समिती प्रमुख :

१. **श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

समिती सदस्य :

२ **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.**

३ **श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.**

४ **श्री. सुरेश खाडे, वि.स.स**

५ **श्री. विष्णू सावरा, वि.स.स.**

६ **श्री. विजयराव औटी, वि.स.स.**

७ **प्रा. सुरेश नवले, वि.प.स.**

८ **श्री. विक्रम काळे, वि.प.स.**

९ **ॲड. उषा दराडे, वि.प.स.**

१० **श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.**

११ **श्री. दिवाकर रावते, वि.प.स.**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या सातवा अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.